बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध




आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक २० | बुधवार,दि.२६ एप्रिल २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## महावितरणकडून महागाईच्या आगीत तेल

**नागपूर :** वाढलेले जीवनावश्यक वस्तुंचे दर, घरगुती गॅस सिलिंडर, पेट्रोल, शिक्षण व आरोग्यावरील खर्च आदींमुळे सामान्य माणसाचे पुरते कंबरडे मोडले आहे. याच महिन्यात महावितरणने वीज दरवाढ करून ग्राहकांना मोठा आर्थिक फटका दिला आहे. आता त्यात महावितरणने अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या स्वरुपात महागाईच्या आगीत तेल ओतले आहे. त्यामुळे ग्राहकांमध्ये तीव्र संतापाची लाट आहे. अतिरिक्त सुरक्षा ठेव आम्ही का भरायची? असा सवाल ग्राहकांकडून होत आहे.आधीच देशातील इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रात वीज सर्वात महाग आहे. तरीही महावितरणने ६७ हजार ६४४ कोटी रुपये तुटीची भरपाई करण्यासाठी वीज दरवाढ करण्याच्या मागणीचा प्रस्ताव महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (एमईआरसी) कडे केला होता. यावर्षी एप्रिल महिन्याच्या १ तारखेपासूनच वीज दरवाढ लागू झाली.

मे महिन्यापासून मोठा आर्थिक फटका बसणे सुरू होणार आहे. राज्यात सरासरी २१ टक्क्यांच्यावर वीज दरवाढ करण्यात आली असल्याचे ग्राहक संघटनेचे म्हणणे आहेएवढी प्रचंड वीज दरवाढ ग्राहकांवर लादली असतानाही महावितरण अतिरिक्त सुरक्षा ठेवीच्या नावावर पुन्हा ग्राहकांकडून पैसे लुबाडण्याचा प्रकार करीत असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे. यापूवी सुरक्षा ठेवीची रक्कम एका महिन्याच्या बिलाइतकी होती. मात्र, नवीन नियमांनुसार एप्रिल २०२२ पासून ती दुप्पट म्हणजे दोन महिन्यांच्या बिलाइतकी करण्यात आली आहे. त्यामुळे महावितरण ग्राहकांवर आर्थिक ओझ्यांवर ओझे लादण्याचा प्रकार करीत असल्याचे ग्राहकांचे म्हणणे आहे.



### कोट्यवधी रुपचांची लूट

**महावितरणकडून घरगुती वीज ग्राहकांना या महिन्यात पाचशे ते दोन हजाराच्यावर अतिरिक्त सुरक्षा ठेवीचे बिल पाठविण्यात आले आहे. ही रक्कम वीज वापराच्या सरासरी इतकी आहे. भंडारा जिल्ह्यात २ लाख ७४ हजार २४८ घरगुती ग्राहक आहेत. वाणिज्य ग्राहकांची संख्या १६४४८ तर गोंदिया जिल्ह्यात २ लाख ६९ हजार २२४ घरगुती व १३ हजार ५५५ वाणिज्य ग्राहक आहते. एवढ्या मोठ्या संख्येने असलेल्या ग्राहकांकडील सुरक्षा ठेवीची रक्कम कोट्यवधींच्या घरात आहे. ही कोट्यवधींची रक्कम ग्राहकांच्या खिशातून वसूल केली जाणार आहे.**

### १ टक्का लोकांसाठी ९९ टक्के लोकांचा बळी?

वास्तविकता ९९ टक्के ग्राहक नियमितपणे वीज बिल भरतात. तर उर्वरित केवळ १ टक्का ग्राहक नियमितपणे वीज भरत नाही. जे बिल भरीत नाही. महावितरण त्यांचा वीज पुरवठा खंडित करते. असे असतानाही सरसकट सर्वांसाठीच सुरक्षा ठेवीची रक्कम घेतली जात आहे. केवळ १ टक्के लोकांसाठी ९९ टक्के लोकांचा बळी घेतला जात असल्याने ग्राहकांमध्ये तीव्र संताप आहे.कैलास भेलाव,रमेश ब्राम्हणकर,हरिष ब्राम्हणकर,सुनिल भोंगाडे, राजू शिवणकर आदी बहुतांश ग्राहकांनी सुरक्षा ठेवीवर आपली नाराजी व्यक्त केली.

### अतिरिक्त सुरक्षा ठेवीची गरज काय?

महाराष्ट्र वीज नियामक आयोगाच्या विद्युत पुरवठा संहिता २०२१ च्या कलम १३.१ नुसार, वीज ग्राहकांकडून सुरक्षा ठेव आकारली जाते. सुरक्षा ठेव नियमाने बंधनकारक आहे. दरवर्षी सुरक्षा ठेवची पुनर्गणना केली जाते. त्यानुसार आर्थिक वर्ष संपल्यानंतर नवीन रक्कम ग्राहकाच्या मागील एका वर्षातील सरासरी वीज वापराच्या आधारे निर्धारित केली जाते. महावितरणने यंदा दोन महिन्याच्या बिला इतकी सुरक्षा ठेव वाढविली.

**एक महिन्याची अतिरिक्त सुरक्षा ठेव आधी होती. यंदा त्यात दुप्पट वाढ करण्यात आली आहे. ज्या ग्राहकांना सुरक्षा ठेव भरायची नाही त्यांनी प्रीपेड मीटरची मागणी करावी. प्रीपेड मीटरमध्ये सुरक्षा ठेव रक्कम भरण्याची सक्ती महावितरण करूशकत नाही.**

**- प्रताप होगाडे, अध्यक्ष- महाराष्ट्र वीज ग्राहक संघटना**

## ग्रामसभांच्या अधिकारांवर वनविभागाचे निर्बंध हटवा मोर्चेकरांची मागणी

**देवरी**–सामुहिक वनहक्क दाव्यांतर्गत ग्रामसभांना तेंदुपान संकलनाचे अधिकार बहाल करण्यात आले आहेत. मात्र देवरी तालुक्यातील ग्रामसभांवर वनविभागाने निर्बंध लादून त्यांच्या अधिकारांवर गदा आणली आहे. या प्रकाराचा निषेध आणि विरोध करण्याच्या उद्देशाने संयुक्त ग्राम सभांच्या वतीने आज(ता. २५)हजारो नागरिकांचा मोर्चा काढून उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर स्वाभीमान मेळावा घेत वनविभागाच्या भूमिकेचा जाहीर निषेध वनहक्क धारक नागरिकांनी नोंदवित मागण्यांचे निवेदन उपविभागीय अधिकारी यांना सादर केले.



वनहक्क धारकांस वनहक्क कायदा २००६ मधील प्राप्त अधिकारा नुसार वनांवर सामुहिक वनहक्क प्राप्त झाले आहेत. त्यात ग्रामसभेला गौण वनउपज संकलन व विक्रीचे सर्व स्वामीत्व अधिकार दिलेले आहेत. त्याचे पारंपारीक क्षेत्रातून ( कलम ३ (१) (ग) ) प्रमाणे वनहक्क धारक तेंदुपाने व ईतर वनउपज संकलन करण्याचे अधिकार प्राप्त आहेत. असे असताना उपवनसंरक्षक गोंदिया यांनी तेंदुपत्ता संकलन व विक्री करण्याकरिता ग्रामसभांना अडचणी निर्माण केल्या.गौण वनउपजांचे रहदारी पास (वाहतूक पास) ग्रामसभेऐवजी वनविभागाकडूनच घ्यावे असे निर्देशे दिले. ग्रामसभांद्वारे ठरविण्यात आलेले तेंदुपाने संकलन उद्दिष्टप्रमाणे एकूण प्रमाणित गोणी संकलनावर बंदी आणि वनविभागाचे उद्दिष्ट ठरवून अडचणी निर्माण करण्यात येत आहेत. ग्राम सभांद्वारे विक्रीकरीता जाहीर गावांचे पारांपरिक क्षेत्रात वनविभागाद्वारे ठेकेदार नेमून ग्रामसभांचे तेंदुपत्ता विक्री करणे चुकीचे आहे.तेंदुपाने खरेदीदार ठेकेदारांना ग्रामसभेचे पारंपारिक क्षेत्रातील तेंदुपाने खरेदी करीता धमकावून व चुकीचे मार्गदर्शन करुन ग्रामसभेच्या तेंदुपाने खरेदीकरीता परावृत्त करण्यात येत आहे.त्यामुळे गरीब आदिवासी व इतर वनहक्क धारकांवर एकप्रकारे अन्याय व अत्याचार करणारी आहे. या प्रकरणात तेंदु किंवा इतर वनउपज संकलन व व्यवस्थापन करण्याचे सर्व अधिकार कायद्याने ग्रामसभेद्वारे अधिकृत कार्यकारी मंडळास असताना हे कार्य वनविभागाने करणे व त्याकरीता शासकीय यंत्रणा, स्थानिक संस्था, प्रतीनिधी व व्यक्ती यांच्यावर दबाव निर्माण करुन भिती दाखविणे हे सर्व अन्यायकारक असल्याचे निवेदनात ग्रामसभांचे म्हटले आहे.ग्रामसभेच्या प्रतिनिधी मंडळातील नारायन सलामे, तेजराम मडावी, सुदाम भोयर, नारायण ताराम , विलास भोगारे, उमेश बागडेहरीया, गणेशराम राउत, गजानन शिवणकर यांनी वनविभागाचे हस्तक्षेप तात्काळ थांबविण्याची मागणी या मोर्च्यातून केली आहे.

## दोन महिला नक्षल्यांना बालाघाट पोलिसांनी केले ठार

**गोंदिया:**– शेजारील मध्यप्रदेश राज्यातील नक्षलग्रस्त बालाघाट भागात शुक्रवार–शनिवारच्या मध्यरात्री पहाटे तीन वाजे दरम्यान पोलीस–नक्षलवाद्यांमध्ये झालेल्या चकमकीत टाडा



दलमच्या एरिया कमांडर आणि गार्ड असलेल्या दोन ज्येष्ठ महिला नक्षलवाद्यांना पोलिसांनी ठार केल्याची घटना घडली.या दोघींवर १४–१४ लाखांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते. गेल्या वर्षीही बालाघाट पोलिसांनी ६ नक्षलवाद्यांचा खात्मा केला होता. घटनेची माहिती होताचा पोलीस उपमहानिरिक्षक बालाघाट संजय कुमार, बालाघाटचे पोलीस अधीक्षक समीर सौरभ आणि हॉक फोर्सचे उच्च अधिकार्यांनी घटनास्थळी धाव घेतली.परिसरातील कडला जंगलात हॉकफोर्स आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. ज्यात जवानांनी सुनीता आणि सरिता या दोन महिला नक्षलवाद्यांना चकमकीत ठार केले. सुनीता टाडा दलमच्या भोरम देव, एरिया कमांडर होती. ती सध्या विस्तार दलममध्ये काम करत होती. तर सरिता नक्षलवादी कबीरची रक्षक होती. ती खट्या मोचा दलममध्ये कार्यरत होती. ती सुध्दा विस्तार दलममध्ये सक्रिय होती. दोघांचेही मृतदेह बाहेर काढण्यात आले असून पोलिसांनी दोन्ही मृतदेह जिल्हा रुग्णायात हलविले.दोन्ही महिला नक्षलवाद्यांवर प्रत्येकी १४ लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आले होते अशी माहिती बालाघाटचे पोलीस अधिक्षक समीर सौरभ यांनी दिली.

## तांदूळ चोरणाऱ्या चौघांना अटक,ग्रामीण पोलिसांची कारवाई



गोंदिया– शासकीय योजनेचा तांदूळ काळ्या बाजारात विक्रीसाठी नेणारे वाहन गोंदिया ग्रामीण पोलिसांनी २३ एप्रिलच्या रात्री ११.१० वाजता पकडला.त्या वाहनातून १ लाख ८५ हजार रुपये किमतीचा शासकीय तांदूळ व त्या तांदूळ वाहून नेणारा ट्रक जप्त करण्यात आला.ही कारवाई पोलिस निरीक्षक सचिन म्हेत्रे यांच्या नेतृत्वात करण्यात आली.

काही जण छोटा हत्ती टिप्पर वाहन क्रमांक एमएच ३५ एजे १०७१ मध्ये चोरीचा तांदूळ गोंदिया कडून गोरेगावकडे घेऊन जात असल्याची गुप्त माहिती ग्रामीण पोलिसांना मिळाली.माहिती मिळताच पोलिस निरीक्षक सचिन म्हेत्रे यांनी रात्रगस्तीवरील आपल्या अधिनस्त पोलिसांना घटनास्थळी पाठविले.तांदूळ चोरी करुन घेऊन जाणाऱ्या वाहनाचा शोध घेऊन कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.पोलिस निरीक्षक म्हेत्रे हे स्वत:कारवाई करण्यासाठी रवाना झाले.

पोलिसांना शासकीय वाहनासह किंजल राईस मिलजवळ ढिमरटोली येथे पोहोचण्याच्या सूचना दिल्या.पोलिस स्टाफसह फूडलैंड हॉटेल,ढिमरटोली येथे नाकाबंदी करुन गोंदियाकडून गोरेगावकडे जाणाऱ्या वाहनाला थांबवून तपासणी केली असता या वाहनाच्या मागील डाल्यामध्ये ९ व कॅबिनमध्ये ०२ असे एकूण ११ इसम बसल्याचे आढळले.वाहन क्रमांक एमएच ३५ एजे १०७१ चा चालक सुधीर हंसराज शहारे(३५,रा.मुंडीपार) याला छोटा हत्ती (टिप्पर) मध्ये भरलेल्या माला बाबत विचारणा केली असता त्याने टिप्परच्या डाल्यात तांदूळ असल्याचे सांगितले. **पान २ वर**

## एनएनटीआरमध्ये १२ वाघांची नोंद

**गोंदिया :** राज्यातील सर्वाधिक वाघांची नोंद चंद्रपूर जिल्ह्यात झाली असून, जिल्ह्यात सुमारे २०८ वाघ आहेत. तर एकूणच विदर्भ लॅंडस्केपमध्ये ४४६ वाघांची नोंद आहे. मागील व्याघ्रसंख्येच्या तुलनेत २३ टक्क्यांनी वाढ झाली आहे. भारतीय वन्यजीव संस्थेने विदर्भ लॅंडस्केपचा अहवाल नुकताच प्रकाशित केला. त्यातून ही माहिती समोर आली.यात गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव नागझिरा व्याघ्र प्रकल्पात १२–१७ वाघांची संख्या असल्याचे जाहीर करण्यात आले आहे.सोबतच उमरेड कर्हाडंला व्याघ्र प्रकल्पात ६,गडचिरोली सर्कलमध्ये २७,मेळघाटमध्ये ५५ वाघ असल्याचे जाहिरकरण्यात आले आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकतेच नऊ एप्रिलला व्याघ्रगणनेची आकडेवारी जाहीर केली.



लॅंडस्केपनुसार व्याघ्रगणनेचा अहवाल एकापाठोपाठ एक प्रकाशित करण्यात येत आहे. त्यात नुकताच विदर्भ लॅंडस्केपचा अहवाल प्रकाशित करण्यात आला. त्यानुसार विदर्भ लॅंडस्केपमध्ये ४४६, तर चंद्रपूर जिल्ह्यात सुमारे २०८ व गोंदिया भंडारा जिल्ह्यात १२ वाघांची नोंद आहे.

ताडोबा–अंधारी व्याघ्रप्रकल्प हा वाघांसाठी सवोत्कृष्ट नैसर्गिक अधिवास आहे. तसेच वाघांना मुबलक प्रमाणात येथे शिकार उपलब्ध आहे. त्यामुळे एकट्या ताडोबा–अंधारी व्याघ्र प्रकल्पात वाघांची संख्या सर्वाधिक असून, त्यापाठोपाठ ब्रम्हपूरी वनक्षेत्रात संख्या आहे. वनक्षेत्राच्या तुलनेत वाघांची संख्या अधिक असल्यामुळे व्याघ्रप्रकल्पातून वाघ बाहेर पडत आहेत.

परिणामी मानव–वन्यजीव संघर्ष वाढला आहे. अधिवास आणि अस्तित्वासाठी दोन वाघ आपसात लढत आहेत. त्यामुळे व्याघ्रप्रकल्पाबाहेरील वाघांच्या स्थलांतरणाची सरकारी योजना आहे

## सरकार पडण्याच्या भविष्यवाणीवर छगन भुजबळ म्हणाले,सरकारला धोका नाही

**गोंदिया :** शिवसेनेचे नेते, खासदार संजय राऊत यांनी पुढील १५ दिवसांत राज्यातील शिंदे–फडणवीस सरकार पडेल, त्यांचा डेथ वॉरंट निघाला आहे, असे खळबळजनक वक्तव्य केले आहे. यावर राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी, सरकारमधील १६ आमदारांवर अपात्रतेची कारवाई झाली तरी सध्या त्यांच्याकडे १६५ असा बहुमताचा आकडा असल्यामुळे माझ्या मते सध्या तरी सरकारला धोका नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर कारवाई झाल्यास नवीन मुख्यमंत्री राज्याला प्राप्त होऊ शकतो, अशी प्रतिक्रिया दिली.

ओबीसी एल्गार परिषदेसाठी भुजबळ अर्जुनी मोरगावला आले होते. कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना ते म्हणाले, शिंदे गट ज्या शाळेतून आलेला आहे, त्या शाळेचे उद्धव ठाकरे हे मुख्याध्यापक राहिलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या सभेदरम्यान घोषणाबाजी किंवा कोणताही व्यत्यय आणण्याचा प्रयत्न केला तर ठाकरे गटही भविष्यात तेच करणार. त्यामुळे शिंदे गटाने असे उपद्रव करण्याचा नाद करू नये. वज्रमूठ सभांच्या माध्यमातून आपण मविआचे प्रवक्तेपद मिळविण्याचा प्रयत्न करीत आहात, या मंत्री उदय सावंत यांच्या अरोपाबाबत भुजबळ म्हणाले,



पहिले तर ते पद रिक्त नाही, त्यावर संजय राऊत भक्कमपणे आरुढ आहेत आणि मी यापूर्वी कधीही कोणत्याही पक्षात प्रवक्ते पदावर राहिलेलो नाही. त्यामुळे माझी अशी कोणतीही इच्छा नाही. मी मैदानात लढणारा नेता आहे. त्यामुळे मला माझ्या कर्तबगारीच्या बळावर बाळासाहेबांनी नगरसेवक, महापौर, आमदार केलं. पवारांनीही मला आमदार, उपमुख्यमंत्री केलं. आपण कामगिरी चांगली केली तर पदे मिळत असतात. मध्यंतरी मी शिंदे – फडणवीस यांची भेट घेऊन मंत्रालयात महात्मा फुले, आई सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा लावण्याची मागणी केली होती. त्यांनी ही मागणी त्वरित मंजूर करीत महात्मा फुले, आई सावित्रीबाई फुले यांची प्रतिमा मंत्रालयात लावली, असेही भुजबळ यांनी सांगितले.

## महसूल विभागातील कर्मचारी पदस्थापनेपासून वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी

**गोंदियाः–** प्रशासकीय कामकाज अचूक आणि निदोष व्हावे, कोणतेही हितसंबंध जोपासले न जाता कोणावरही अन्याय होऊ नये, असे अपेक्षित असताना गोंदिया जिल्ह्यात मात्र या परंपरेला उघड फाटा दिला जात आहे. चक्क जिल्हाधिकारी कार्यालयातच बदली संदर्भात दिलेल्या मार्गदर्शक तत्वांना तिलांजली दिली जात असेल तर जिल्ह्यातील इतर प्रकरणात न बोललेलेच बरे. गेल्या १०–१५ वर्षापासून एकाच ठिकाणी ठाण मांडून बसलेल्या कर्मचाऱ्यांच्या बदली प्रकरणात एकाही जिल्हाधिकारी म्हणून आलेल्या अधिकाऱ्याने लक्ष देऊ नये? हे अनाकलनीच म्हणावे लागेल.

यांच्यामुळेच आमगाव येथील पंधरे नामक कर्मचाऱ्याला जीव गमवावा लागला हे सुध्दा विसरता येत नाही. त्यामुळे या कुंडलीबाज कर्मचाऱ्यांचे स्थानांतरण करण्याऐवजी जिल्हाधिकाऱ्यांसारखे अधिकारी हतबल होत नतमस्तक झाले की काय अशी चर्चा कर्मचारी वर्गात नेहमीच ऐकावयास मिळते. गेल्यावर्षी प्रसारमाध्यमांनी सातत्याने यावर लक्ष वेधल्याने खानापुर्ती स्वरुपात हलचल करीत ठाण मांडून बसलेल्यापैकी फक्त गोंदिया तहसिल कार्यालयातील मुकुंद तिवारी यांची बदली करण्यात आली.

मात्र इतरांना तसेच कायम ठेवण्यात आले. यावेळी पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालयातील कार्यरत तसेच गोंदिया उपविभागीय अधिकारी कार्यालयातील कर्मचारी यांचे मुख्यालय न बदलता एकाच मुख्यालयात पदस्थापना देण्याचे प्रयत्न प्रशासनाने सुरु केल्याने चिचगड येथील अप्पर तहसीलदार कार्यालय, सालेकसा, देवरी, अर्जुनी मोरगाव येथील तहसिल कार्यालयात यांना पाठविण्याऐवजी त्यांच्याशिवाय जिल्हाधिकारी कार्यालय चालूच शकत नाही अशा अलिखित नियमच जिल्हाधिकारी,सामान्य प्रशासन उपजिल्हाधिकारी व निवासी उपजिल्हाधिकारी यांनी करुन ठेवल्याने इतर कर्मचारी वर्गाला मात्र अन्याय सहन करावा लागत आहे.

विशेष म्हणजे गोंदिया भंडारा जिल्ह्याचे तत्कालीन विधानपरिषद सदस्य व माजी पालकमंत्री डॉ.परिणय फुके यांनी लक्षवेधीच्या माध्यमातून एकाच ठिकाणी कार्यरत कर्मचारी व तालुका स्तरावर रिक्त पदामुळे कामावर ताण होत असल्याचा प्रश्न उपस्थित केला होता. त्या लक्षवेधी प्रश्नावर सुध्दा गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयातून थातूरमातूर उत्तर दिले गेले होते.त्यानंतर फुके यांचा कार्यकाळ पुर्ण झाल्याने त्यांनी सुध्दा आपल्याच लक्षवेधीवर चुकीची माहिती प्रशासन देत अशा कर्मचार्यांना पाठीशी घालत असल्याबद्दल विचारणा केली नाही.त्यातच आत्ता तर जिल्हाधिकारी हे माजी आमदार फुके यांचेच मित्र असल्याने या प्रकरणात त्यांना कारवाईकरीता बोलतात की गप्प बसतात हे सुध्दा बघायला मिळणार आहे.

अशा कर्मचारीवर्गामुळे जिल्हाधिकारी कार्यालय हे भ्रष्टाचाराचा पायवा रोवत असल्याचे गेल्यावर्षी नाझरच्या रुपात झालेल्या एसीबीच्या कारवाईमुळे गोंदियात तर आमगावातील एका महिला कर्मचारीमुळे बघायवयास मिळाले. विशेष म्हणजे नाझर मेमन यांची मुळआस्थापना देवरी येथे असतानाच परत त्यांना एसीबीच्या कारवाईनंतर तिथेच का पाठवण्यात आले हा सुध्दा प्रश्न निर्माण झाला आहे.

प्रशासन म्हटले की शिस्त ही असलीच पाहिजे. शिस्त पाळली



जात नसेल तर प्रशासकीय कामात चुका आणि अनियमितता या बाबी अपरिहार्य आहेत. कर्मचारी असो वा अधिकारी यांचे नियमित अंतरालाने स्थानांतरण हे अपेक्षित आहे. तसा प्रशासकीय नियम देखील आहे. अधिक काळ एकाच ठिकाणी ठाण मांडून एखादा कर्मचारी वा अधिकारी राहत असेल तर त्याचे नागरिकांशी हितसंबंध वाढलेले असतील. परिणामी, अशा कर्मचाऱ्याकडून शासकीय कामात अनियमितता वा गैरप्रकार होण्याची शक्यता बळावते,हे मेमन व श्रीमती रहांगडाले यांच्यावर झालेल्या एसीबी कारवाईतून सिध्द झाले आहे.

असे असताना गोंदिया जिल्ह्यातील महसुल विभागातील सुमारे वीसांवर कर्मचारी हे प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून गेल्या १०–१५ वर्षापासून एकाच ठिकाणी कुंडली मारून बसले आहे. याचा फटका सरळसरळ इतर कर्मचाऱ्यांच्या कार्यक्षमतेवर जाणवत आहे.गोंदिया उपविभागीय कार्यालयातील पी.झेड.बिसेन नियुक्तीच्या दिनांक पासून उपविभागीय अधिकारी कार्यालय गोंदिया येथेच कार्यरत आहेत.किशोर राठोड वाहनचालक ते कनिष्ठ लिपिक व अव्वर कारकून या पदावर एकाच इमारतीमध्ये कार्यरत आहेत.अव्वल कारकून कु.एस.एम.बनसोड या ७ वर्षापासून तर महसूल सहाय्यक ए.जी.मेश्राम हे गोंदिया उपविभागीय कार्यालयत ४ वर्षापासून कार्यरत आहेत. बिसेन यांचे तर तेरा वर्ष सात महिने म्हणजेच एकूण जवळपास १४ वर्षाचा कालावधी एकाच कार्यालयात एकाच शाखेत झालेला आहे

कर्मचाऱ्यांचे असो वा अधिकाऱ्यांचे, नियमित अंतराने स्थानांतरण केले जात नसेल तर त्यांचा कार्यात निरसता तर येतेच, पण नागरिकांशी हितसंबंध आल्याने एखाद्या प्रकरण्यात चुकीच्या पद्धतीने कामे होण्याची दाट शक्यता असते. याशिवाय अधिक काळ एकाच पदावर वा एकाच ठिकाणी राहिल्यास आर्थिक गैरव्यवहार होण्याची शक्यता देखील नाकारता येत नाही. याशिवाय इतर विभागातील कार्याचा अनुभव अशा कर्मचाऱ्यांना येत नाही. परिणामी, भविष्यात याचा फटका या कर्मचाऱ्यांमुळे शासन प्रशासनाला बसल्यास नवल वाटू नये.

मात्र, गोंदिया जिल्ह्यातील महसुल विभागाचे प्रमुख कार्यालय असलेल्या गोंदिया जिल्हाधिकारी कार्यालयाला या सर्वांचे भानच राहिले नाही की काय? अशी परिस्थिती आहे. जिल्हाधिकारी कार्यालयांतर्गत जवळपास १९ कर्मचारी हे नियुक्तीच्या तारखेपासून आपल्या मूळ कार्यालयात फक्त नाममात्र रुजू झाले. मात्र, त्यांची सेवा इतर कार्यालयात संलग्न आहे. किशोर राठोड हे तर २०१२ पासून वाहन चालक ते कनिष्ठ लिपिक ते अव्वल कारकून अशा पदोन्नतीनंतरही एकाच कार्यालयात आहेत. असे असताना जिल्हाधिकारी कार्यालयातील सामान्य प्रशासन विभाग धृतराष्ट्राप्रमाणे बदली प्रक्रिया पार पाडत असल्याचे स्पष्ट होते.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील अनेक अधिकारी–कर्मचारी हे अनेक वर्षांपासून एकाच ठिकाणी कार्यरत असून त्यांच्या कार्यप्रणालीचा उद्रेक लक्षात येत आहे. याबाबत अनेक कर्मचाऱ्यांनी देखील अनेकदा प्रशासनाकडे विनंती केली आहे. पण, याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे. संबंधितांच्या हिताचे अधिकारी–कर्मचारी यांना जिल्हाधिकारी कार्यालयात महत्वाच्या पदांवर नियुक्ता देण्यात आल्या आहेत. बदली संदर्भातील सर्व नियम धाब्यावर ठेवून फक्त कर्मचारी–अधिकारी यांची जवळीक, एवढाच निकष लावला जातो. एखाद्या कर्मचाऱ्याने एका ठिकाणी ६ वर्षे सेवा बजावली असेल तर त्याची बदली न करता सदर नियमाला पळवाट शोधून काढली जाते, हे येथे विशेष. यात विशेष म्हणजे अशा कर्मचा?यांची पदोन्नती पश्चात सेवा गणना करून आहे त्याच ठिकाणी पदस्थापना केल्याचे चित्र तयार केले जाते. अनेक कर्मचाऱ्यांची पदस्थापना ही तर फक्त कागदोपत्री इतरत्र करण्यात येऊन सेवासंलग्न या पर्यायाखाली त्यांना वर्षानुवर्षे त्याच ठिकाणी कार्यरत ठेवण्यात येत आहे.

याचे परिणाम हे गोंदिया जिल्ह्यातील देवरी तालुक्यात पहावयास मिळालेले आहे. बाहेरील तालुक्यातील कर्मचारी यांना पदस्थापना किंवा सेवासंलग्न जिल्हाधिकारी कार्यालयात केले जात असून जिल्हाधिकारी कार्यालयातील कार्यरत कर्मचाऱ्यांना इतर तालुक्यातील तहसील कार्यालय व उपविभागीय कार्यालयात सेवासंलग्न केल्याची बाब साशंकता निर्माण करणारी आहे. विशेष म्हणजे काही कर्मचारी तर नियुक्तीच्या दिवसापासून आपल्या मूळ पदस्थापना असलेल्या कार्यालयात काम न करता ते इतर कार्यालयात काम करीत असल्याचे निदर्शनास आले आहे.

## संपादकीय

# सरकार काहीतरी लपवतेय!

नवी मुंबईत खारघर येथे झालेल्या महाराष्ट्र भूषण समारंभात जो अपघात झाला त्यात नेमके किती भाविक दगावले याची खरी माहिती अजूनही समोर येत नाही. उष्माघाताने १३ भाविक दगावले असल्याचे सांगण्यात येत असले तरी लाखो लोकांच्या गर्दीत यापेक्षा जास्त लोक गेले असल्याची जी चर्चा सुरु आहे त्यावर सरकार किंवा आयोजकांच्या वतीने अद्यापही कुणी का बोलायला तयार नाही ? गेल्या दोन दिवसांपासून या गर्दीतील चेंगराचेंगरी दाखविणाऱ्या काही चित्रफिती सोशल मीडियावर फिरवल्या जात आहेत त्यातून तर वास्तव फारच भयंकर जाणवत आहे. सरकारच्या कोणत्याही खात्याला त्याची दखल घ्यावीशी का वाटत नाही? दुसरीकडे धर्माधिकारी यांच्या श्री संप्रदायातील लोकांना त्यावर काहीही बोलण्याची मनाई करण्यात आली असून लाखो लोकांमधून शंभर दोनशे लोक मेलेत तर बिघडले कुठे ? अशी चीड आणणारी वक्तव्ये केली जात आहेत, हा असंवेदनशीलतेचा नमुना म्हणावा लागेल.

या अपघाताचे कवित्व अजूनही संपले नाही जसा जसा काळ पुढे जात आहे तशी काही दृश्ये आणि पुरावे समोर येताना दिसत आहेत. या अपघातात प्राण गमावलेल्या लोकांचा आकडा शंभरपेक्षा जास्त असावा अशी शंका अनेकांकडून व्यक्त होत आहे. खुद्द विरोधी पक्षनेते द्वय अजित पवार आणि अंबादास दानवे यांनी झालेल्या प्रकारची स्वतंत्र चौकशी करावी अशी मागणी करुन आता चार दिवस उलटले तरी त्यावर सरकारची किंवा गृहमंत्र्यांची कोणतीही भूमिका का जाहीर होत नाही. नवी मुंबई परिसरातील अनेक रुग्णालयात अजूनही असंख्य लोक भरती झाल्याचे सांगितले जाते मग त्यांचा नेमका आकडा का सांगितला जात नाही? सरकारचे प्रमुख म्हणून एकनाथ शिंदे आणि गृहमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस याना या प्रकरणात नेमके काय लपवायचे आहे? असाही प्रश्न विचारला जात आहे. सरकारने एकदा यावर सविस्तर माहिती घेऊन भूमिका स्पष्ट केली पाहिजे.

मुळात सरकारी पुरस्कार सोहळे सरकारने ठरवलेल्या जागेत व्हायला हवेत असे असताना ज्यांना हा पुरस्कार दिला गेला त्यांच्या मर्जीने हे सरकार वागायला तयार का झाले त्याचे कारण सरकार चालविणारे प्रमुख घटक या बुवांचे भक्त आहेत हे आता उघड झाले आहे. अपघात झाल्यानंतर प्रशासन पातळीवर नेमके काय रामायण घडले त्याचे दर्शन आता व्हायला लागले आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याची जबाबदारी मुळात ज्या सांस्कृतिक खात्याकडे असते त्या खात्याने खारघरला सोहळा घेण्यास संमती नाकारली होती. मुख्यमंत्री शिंदे याना मात्र अप्पा धर्माधिकारी आणि त्यांच्या मागे असणाऱ्या लाखो मतांची मर्जी सांभाळायची होती त्यामुळे जशी अप्पांची मर्जी तसे शिंदे वागायला लागले. पुरस्कार वितरण कार्यक्रमाची तयारी कशी सुरु आहे याचा आजवर मुख्यमंत्री कधीच आढावा घेत नसतात मात्र इथे शिंदे तो घेताना दिसले याचा अर्थ आपले मुख्यमंत्री सुद्धा भक्ताच्या भूमिकेत शिरले होते हे लक्षात येते.

राष्ट्रीय पातळीवर या पुरस्काराच्या निमित्याने राज्याची मोठी नामुष्की गेल्या काही दिवसात होत आहे ती यापूर्वी कधी झाली नाही. पुरस्कार वाटपाचे निकष गर्दी खेचणे हे कधीपासून झाले? याचा मोठे नवल लोकांना वाटत आहे. केंद्रात भारत रत्न हा देशाचा सर्वात मोठा सन्मान असतो मात्र तो सुद्धा कधीच दिल्लीच्या बोट क्लबवर विराट सोहळा घेऊन वितरित केला जात नाही. त्यासाठी कोट्यवधी रुपयांची उधळण केली जात नाही. कितीही मोठा पुरस्कार असला तरी तो राष्ट्रपती भवनात वितरित केला जातो. आपल्याकडेही विशाल आणि ऐसपैस असे राजभवन असताना सोहळा इतरत्र का हलविला गेला आणि लाभार्थी म्हणेल तेवढी संख्या आणून शक्ती प्रदर्शन का केले गेले? याचे उत्तर कुणी द्यायला तयार नाही. प्रश्न असंख्य आहेत, त्याची उत्तरे कुणी द्या-वीत असा या सरकार आणि प्रशासनात संभ्रम आहे. जो तो हात वर करताना दिसत आहे.

सर्वात महत्वाचा प्रश्न जो प्रत्येक नागरिक विचारत आहे तो म्हणजे या सोहळ्यासाठी १४ कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आले होते. एवढा पैसा नेमका कशावर खर्च करण्यात आला? त्याचे उत्तरही अर्थ खाते, पालकमंत्री किंवा सांस्कृतिक खातेही द्यायला तयार नाही. मोठा समारंभ होता,राज्यभरातल्या वृत्तपत्रात पानभर जाहिराती आणि वेगळा तामझाम सरकारने केला होता त्याला खर्चही मोठा येणारच आहे मग खर्चाचा तपशील देताना जबाबदार खात्याचे हात का थरथर कापत आहेत ? जो काही हिशेब असेल तो एकदा जनतेसाठी खुला करण्याचीहिम्मत सरकारने दाखवली पाहिजे. शेवटी खर्च होणारा पैसा जनतेचा असतो त्यामुळे त्याचा हिशेबही जनतेला कळायला हवा. सरकार गतिमान असेल तर त्याला पारदर्शी हे आणखी बूड लावायला सत्ताधारी का घाबरत आहेत? सरकार या प्रकरणी काहीतरी लपवत आहे असा समज होणे धोक्याचे आहे.

# सरकारकडून गॅस ग्राहकांना ९ रुपये ९५ पैसे सबसिडी देऊन बोळवण.!



**गोंदिया:** घरगुती गॅस सिलिंडरची बंद केलेली सबसिडी सुरू झाली असून ९ रुपये ९५ सबसिडी देवून ग्राहकांची बोळवण करण्यात येत आहे. रोजच वाढणा?या जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईमुळे सर्वसामान्य जनता हैराण झाली आहे. त्यातच केंद्र सरकारने ही तुटपुंजी सबसिडी देवून ग्राहकांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. अशी संतप्त भावना ग्राहकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

सर्वत्र वाढत्या महागाईने सर्वसामान्य जनता अक्षरश: वैतागून गेली आहे. जगाव तरी कसं हाच प्रश्न त्यांना सतावत आहे. गॅस सिलिंडर च्या वाढत्या किंमतीमुळे गेली काही वर्षांपासून बंद असलेली चूल वेळ येथील सर्व सामान्यांवर आली असून उज्वला गॅस योजनेतून १०० रुपयात दिलेले गॅस सिलिंडर सर्व सामान्यांच्या घरातून इतिहास जमा होण्याच्या मार्गावर आहेत. गॅस सिलिंडर दर कमी केल्यास आर्थिक हातभार लागणार आहे. परंतु गॅसच्या दरात वारंवार वाढच होत आहे. त्यामुळे महिला वर्गाला स्वयंपाक घराचे बजेट सांभाळताना मोठी कसरत करावी लागत आहे. कोरोना काळापासून सर्वसामान्य माणसांची आर्थिक परिस्थिती खालावलेली आहे. त्यामुळे घरगुती गॅसचे दर कमी करून त्यांना दिलासा द्यावा किंवा गॅस सबसिडी पूर्ववत सुरू करण्यात यावी, अशी मागणी सर्व स्तरातून करण्यात आल्याने केंद्र सरकारने ९ रुपये ७५ पैसे गॅस सबसिडी देवून ग्राहकांच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. महागाईने सर्वसामान्य जनता भरडली जात आहे. याची सोयरसुतक कोणालाच नाही. सर्व मंडळी राजकारण करण्यात मरन आहेत. रोज जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत आहेत. एकमेकांवर राजकीय चिखलफेक करणारी राजकीय मंडळी, कार्यकर्ते वाढत्या महागाईवर मात बोलण्यास तयार नाहीत. मार्च महिन्याच्या एक तारखेला घरगुती गॅस सिलिंडरचे ३०, ४०, ५० रुपयांनी दर वाढविण्यात येत आहेत. याबद्दल महिला वर्गातून संताप व्यक्त केला जात आहे. वाढणाऱ्या महागाईमुळे घरचे बजेट मात्र कोलमडले आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# विदर्भातील सत्यशोधकी विवाह एक आढावा

मानवी जीवनामध्ये, असे काही महत्वाचे विधी-संस्कार करण्याचे प्रसंग असतात. त्यामध्ये जन्म, लग्न व मृत्यू या तीन प्रसंगी विशेष विधी संस्कार करुन ते पार पाडले जाते. वेगवेगळ्या धर्मात त्यांचे वेगवेगळे विधी असतात. अणि ते प्रसंगानुरुप केले जातात. त्यांचे महत्व आजच्या आधुनिक म्हटल्या जाणाऱ्या काळात जसे विशेष आहेच तसेच ते प्राचीन काळी मनुष्य प्रागतिक दिशेने वाटचाल करतानासुद्धा होते.

त्यातीलच लग्न किंवा विवाह ही मानवाच्या जीवनातील अत्यंत महत्वाची घटना होय. त्यातील आनंददायक व उत्साहवर्धकता स्वाभाविक होय. परंतु येथील आर्यभट्टांनी त्याला कर्मकाडांचे स्वरूप देऊन व आपल्या रोजी-रोटीचा तसेच बहुजनांना गुलाम बनविण्यासाठी त्याच उपयोग केल्याने दिसून येते. ज्या काही महत्वाच्या क्षणी त्या कुटुंबाने आनंद किंवा दुख वाटून घेऊन हा प्रसंग साजरा करावा, त्यावेळी भटब्राम्हणांचे महत्व वाढविण्याचे काम येथील शोषकांनी करुन बहुजनांच्या आनंदावर दडपण व दुखाच्या प्रसंगी त्यांना दिल-ासा देण्यापेक्षा भयभीत करण्याचे कर्मकांड सांगून त्याचा फायदा घेतल्याचे दिसते.

आणि म्हणूनच भयमुक्त असा बहुजन समाज भटमुक्त करावा यासाठी महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यामध्ये दलाल असणाऱ्यांना हद्दपार करण्याची मानसिकता तयार करण्याचा प्रयत्न केला आणि गुलाम बनविणाऱ्या प्रत्येक विधी-संस्कारांना पर्यायी व्यवस्था करुन दिली. जेणे करुन जीवनात पोकळी निर्माण होणार नाही आणि बहुजन भटमुक्त होऊन भयमुक्त होतात.

विवाह किंवा लग्न या प्रसंगाचे महत्व जाणून त्यांनी त्यासाठी काही सत्यशोधक समाजोक्त पूजा विधी सांगितली. महात्मा जोतीराव फुलेंच्या मते लग्न म्हणजे हा एक मानव पुरुष व स्त्री हे उभ्यता मरे पावेतो एकमेकांचे साथी व साहकारी होऊन एकचित्ताने वर्तन करुन त्यांनी सुखी व्ह-ावे, म्हणून जी काही परस्परांशी कबुलायत करण्याची वहिवाट घा-तली आहे, त्यास लग्न म्हणतात. त्यासाठी त्यांनी वर महटल्याप्रमाणे सत्यशोधक समाजोक्त विवाहसंबंधी दोन प्रती छापून प्रसिद्ध केल्या होत्या. त्यामध्ये त्यांनी विवाहप्रसंगी म्हणावयाचे सत्यशोधकी मंगलाष्टक लिहिले. त्यांची पूजाविधी कशी असावी ते सांगितले. वर आणि वधू यांनी घ्यावयाची शपथ या पद्धतीने मांडणी केली.

यामध्ये त्यांनी ब्राम्हणांची सावली सुद्धा पडू देऊ नये असे सांगितले. या पद्धतीची लग्ने त्यांनी स्वत:पार पाडून नवा इतिहास घडविला. त्यातील पहिले लग्न सिताराम जबाजी आल्हाट, पुणे व राधाबाई ग्यानोबा निंबणकर यांचे तर दुसरे लग्न ग्यानोबा कृष्णाजी ससाणे, हडपसर व काशीबाई नारायणराव शिंदे, पर्वती यांचे झाले. या पद्धतीने त्यांनी स्वत:च्या खर्चातून लग्ने लावून देत असतानाच, ब्राम्हणांनी आमचे आर्थिक नुकसान होते व आमचा हक्क डावलला जातो म्हणून कोर्टात दावे सुद्धा केले. परंतु त्याचा निकाल महात्मा जोतीराव फुले आणि सत्यशोधक समाजाच्या बाजूने लागला.

पुढे अशा विवाहाचे लोण जिथे-जिथे म. फुलेंचे सहकारी गेले तेथे-तेथे पसरत गेले. विदर्भामध्ये म्हणजे पुर्वीच्या सी.पी.अॅन्ड बेरार मध्ये हे लोण महात्मा फुलेंचे सहकारी कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी आणले. ते अमरावती जिल्ह्यात अचलपूर (पुर्वीचा) आताच्या चांदूर बाजार मधील करजगावी आले तेव्हा इकडे सुद्धा सत्यशोधकी विवाह होऊ लागले. तत्पुर्वी पुणे जिल्ह्यात ओतूर येथील विज्ञान शास्त्री नारोबाजी महाघट आणि धर्माजी रामजी डुंबरे हे गृहस्थ १९०० साली वऱ्हाडात करजगावात आले आणि त्यांनी सभेत भिक्षुकशाहीचे अत्याचार लोकांसमोर मांडून येथे सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन केली. त्यांनी सत्यशोधक विधी लोकांना सांगून ब्राम्हणेत्तर लोकांमध्ये जागृती घडवून आणली. त्यांचा परिणाम कृष्णराव भालेकर या भागामध्ये आले आणि त्यांना सहकार्य मिळाले.

त्यामध्ये करगावच्या कृष्णाजी कर्काजी चौधरी यांच्या मुलींचे लग्न (नर्मलाताईचे) सत्यशोधकी पद्धतीने झाले. या लग्नात पुराहितांचे काम तात्यसाहेब कदम यांनी केले. डॉ. पंजाबराव देशमुख व विमलाताई देशमुख हे यावेळी उपस्थित होते. या निर्मलाताई म्हणजे परसम महसंगणकाचे जनक



**सतीश जामोदकर**
हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८

डॉ. विजय भाऊसाहेब भटकर यांच्या आई होत. त्यकाळी अशी एक लाटच ब्राम्हणेतरामध्ये निर्माण झाली आणि त्यांनी ब्राम्हणांचे गुलामगिरीचे जू झुगारुन दिले.

या इतिहासाकडे बघताना आज याच पद्धतीला मानून परंतु त्यामध्ये काळानुरुप बदल करुन विदर्भात दरवर्षी सत्यशोधक समाज पद्धतीने विवाह घडवून आणले जातात. प्रा. नूतन माळवी यांनी सत्यशोधक विवाह पद्धती अशी छोटीशी पुस्तिका प्रकाशित करून हे विवाह आज कशा पद्धतीने पार पाडले पाहिजेत यांचे सुंदर विवेचन केले आहे. त्यामध्ये त्यांनी ज्या जोडप्यांनी सत्यशोधकी विवाह केले व ते आनंदाने नांदताहेत अशा जोडप्यांची नावे आहेत ती याप्रमाणे:-अशोक ठाकरे-अनिता डहाके (उमरेड), अजय इंगोले-अनिता (देवळी), सविता घोडे-अशोक मेश्राम (वर्धा), कपिल भुटे-कल्पना वाढोणकर (वर्धा), सुनिता खंडाळे- विलास काळे (यवतमाळ), विजय बाभुळकर-दुर्ग, सतीश माणिकराव जामोदकर-लक्ष्मी क्षीरसागर (राजनापूर्णा अमरावती), संजय नारखेडकर-प्रांजली हुकरे, वैशाली ढग-रवीकांत जाधव (बुलढाणा), अनुज हुलके-संध्या श्रावण मेंडुले (वडनेर), सुरेश-सुनीता भुजाडे (नागपूर), दीपक उत्तमराव उलेमाले (वाशीम), सुचिता गजानन माने (हिंगोली), संगीता फुलसिंग नाळे-संदीप रामधन कटरे (आमगव्हाण,ता.मानोरा), प्रवीण साहेबराव गोबरे (टाकरखेडा मोरे), प्रतिभा वसंतराव पाटील (शेंदूरजनाघाट), सोनाली-अनिल कांडलकर (परतवाडा)-राहूल बाबुराव कोरडे (टाकरखेडा), हरिष यावले-भारती नांदे (अकोट), वैजयंती सुधाकर हेडनकर (वऱ्हा), हर्षल जगदीशराव चर्जन (आमला विश्वेश्वर), अमोल अरुण मेहेर (परतवाडा), पुनम महादेवराव जुनघरे (अमरावती), सविता ज्ञानेश्वर वासनकर (नेरपिं-गळाई), प्रवीण बाळासाहेब जावकर (करजगाव), शुभांगी अरुण मेहरे (परतवाडा), डॉ. मनिष पंडीत अेंडाईक (शिरपूर, धुळे), पल्लवी दिनकरराव आमले (अमरावती), मनिष रामचंद्र खेरडे (वरूड), इत्यादी सत्यशोधकी ज्ञात, अज्ञात विवाह भटक्या विमुक्त, अनुसूचित जाती-जमाती तसेच ओबीसी वर्गात दरवर्षी घडवून आणले जात आहेत. त्यासाठी सत्यशोधक कार्यकर्ते पुढाकार घेऊन कार्य करतात. तसेच सामूहिक सत्तश-ोधक विवाह दीनबंधू माळी समाज कल्याण मंडळ यवतमाळच्यावतीने पार पाडले जातात.

पुन्हा एकदा महात्मा फुलेंची ही विवाह पद्धती माळी-तेली-कुणबी आदि बारा बदुलेतदार समाजातील तरूण-तरुणींनी स्वीकारुन लग्नसभारंभातील हिडीस प्रकार थांबवून भट, लोकांचे पोटभरु धंदे व त्यांचे सांस्कृतीक वर्चस्व कमी करुन अस्सल महाराष्ट्र देशी पद्धत स्विकारावी अशी अपेक्षा आहे.

नुकताच २९ नोव्हेंबर २०१३ ला म. फुले स्मृतीदिनी देऊगाव राजा येथे सत्यशोधक शिक्षक परिषदेच्यावतीने दीपाली तोंडोलेकर (सिंधुदुर्ग) आणि अतुल खरात (स्वयंदेव ता. शिंदखेडराजा) या सत्यशोधक कार्यकर्त्यांचा सत्यशोधकी पद्धतीने विवाह संपन्न झाला. प्राचार्य विठ्ठल टेकाडे, शाम मुडे, डॉ. गजानन जाधव यांनी आयोजित केलेल्या या सत्यशोधक विवाहप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून दीपक कसाळे, डॉ. दिलीप चव्हाण व अध्यक्ष म्हणून डॉ. किशोक जाधव उपस्थित होते.

दि.३० नोव्हेंबर २०१३ रोजी बहुजन संघर्षचे सक्रीय कार्यकर्ते अनिल वानखडे यांची मुलगी कु.स्नेहल अनिल वानखडे हिचा जालना येथे वैभव विश्वासराव कुलकर्णी यांच्यासोबत सत्यशोधकी पद्धतीने विवाह संपन्न झाला. या विवाह सोहळ्यासाठी बहुजन संघर्षचे संपादक नागेशभाऊ चौधरी, पुष्पापाई चौधरी, साहेबराव विधळे, भाई अरविंद वानखडे, बाबा भाकरे, डॉ. सुधाकर डेहनकर, डॉ. गोविंदराव वरवाडे, प्रमादे मून, शरद वानखडे, माजी मंत्री सुनीलभाऊ देशमुख आदि मान्यवर उपस्थित होते. या विवास सोहळ्याचे सत्यशोधकी पद्धतीने संचालन रामदास काका इंगोले यांनी केले.

# जागतिक हिवताप दिनानिमीत्त रॅलीचे आयोजन




**गोंदिया:** जागतिक हिवताप दिनानिमीत्त जिल्हा हिवताप कार्यालय गोंदिया यांचे वतीने २५ एप्रिल रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय गोंदिया येथे हिवताप जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अमरीश मोहबे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.नितीन कापसे, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ.वेदप्रकाश चौरागडे तसेच अवैद्यकीय अधिकारी दिलीप कुमरे यांनी हिवतापाविषयी प्रतिज्ञा घेऊन रॅलीला सुरुवात केली.

यावेळी डॉ.वेदप्रकाश चौरागडे यांनी विद्यार्थी तसेच उपस्थित लोकांना २५ एप्रिल जागतिक हिवताप दिनाचे महत्व समजावून सांगून आवाहन केले की, ही वेळ शुन्य मलेरियाला वितरीत करण्याची आहे. त्याकरीता सर्वांनी स्वत:च्या आरोग्याची काळजी घेऊन स्वत: पासून सुरुवात करावी. जसे की, झोपतांनी मच्छरदानीचा नियमीतपणे वापर करावा असे सांगितले.डॉ.नितीन वानखेडे यांनी सांगितले की, नाल्या गटारे वाहती करावी, साचलेल्या पाण्यात जळालेले इंजीन ऑईल टाकून डासांचा नायनाट करावा.

डॉ.अमरीश मोहबे म्हणाले, आपण स्वत: आपल्या आरोग्याची काळजी घेऊन डेंग्यू मलेरिया सारख्या गंभीर व जीवघेण्या आजारापासून सावध राहावे. ताप आल्यास नजिकच्या आरोग्य कर्मचाऱ्यांशी संपर्क करुन रक्ताची तपासणी करावे. कोणताही ताप हा हिवताप असू शकतो, म्हणून तात्काळ रुग्णालयात जाऊन डॉक्टरांशी संपर्क करावे.

सदर कार्यक्रमात प्रामुख्याने परिचारिका प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थी व शहरी विभागातील आशा सेविका यांनी "कोरडा दिवस पाळा - हिवताप टाळा', "माझ्यापासून सुरुवात करु - हिवतापाला शुन्य करु', "येता कणकण तापाची - करा तपासणी रक्ताची' इत्यादी घोषवाक्य वापरुन जनजागृती करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जिल्हा हिवताप कार्यालयातील आशिषकुमार बले, पंकज गजभिये, शितलकुमार दोनोडे, के.एन.डोंगरे, श्री. ठाकुर, श्री. जायभाये, अजय चौधरी, जितु वैसवारे व विजयसिंग बनाफर यांनी मोलाचे परिश्रम घेतले.

## सर्वोत्कृष्ट संचलनाबद्दल गडचिरोली, गोंदिया सी-६० पथक प्रथम

**गोंदिया-** गडचिरोली पोलिस दल व गोंदिया पोलिस दलाच्या सी-६० पथकाने संयुक्तरित्या गौरवास्पद कामगिरी करून २६ जानेवारी २०२३ रोजी मुंबई येथे झालेल्या संचलनामध्ये सर्वोत्कृष्ट संचलन करुन प्रथम क्रमांकाचा चषक पटकावला आहे. त्याबद्दल सर्व स्तरातून गोंदिया व गडचिरोली पोलिस दलाचे अभिनंदन केले जात आहे.प्रजासत्ताक दिन संचलनामध्ये सर्वोत्कृष्ट संचलन करणाऱ्या पथकांना १ मे २०२३ महाराष्ट्र दिनाच्या ६३ व्या वर्धापन दिनी अपर पोलिस महासंचालकांच्या हस्ते चषकाचे वितरण करण्यात येणार आहे.

त्याबाबतची रंगीत तालीम २९ एप्रिल २०२३ रोजी मुंबईतील दादर परिसरातील शिवाजी पार्क येथे घेण्यात येणार आहे.गडचिरोली व गोंदिया पोलिस दलाचे सी-६० पथक नक्षलविरोधी कारवायांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करतातच, त्याचसोबत आपल्या शिस्तीचे आणि एकजुटीचे प्रदर्शन त्यांनी संचलनातून दाखवून दिले आहे.

गडचिरोली जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक नीलोत्पल,गोंदियाचे निखील पिंगळे यांनी संचलनात सहभागी सर्व अधिकारी व जवानांचे कौतुक केले असून भविष्यात अशीच कामगिरी करण्याबाबत शुभेच्छा दिल्या आहेत.

पान १ वरुन

कॅबिनमध्ये बसलेला धर्मेद्र मारबदे (रा.ढिमरटोली )च्या मदतीने चोरून मुंडीपार येथे घेऊन जात असल्याचे सांगितले.मनीष महेंद्र शेंडे (३०,रा.कुऱ्हाडी) असे सांगून टिप्परच्या मागे मालावर बसलेले लोक हमाल असल्याचे सांगितले.बम्लेश्वरी गोडाऊन, मिलटोली येथील संजय डोमळे व धर्मेद्र मारबदे यांच्या मदतीने गोदामातील प्रत्येकी ५० किलो वजनाचे १८५ कट्टे तांदूळ चोरल्याचे सांगितले.टिप्परमध्ये भरलेल्या मालाची तपासणी केली असता प्रत्येक कट्ट्यावर लावलेल्या लेबलवरील

डीसीपीएस स्किम,डीएमओ गोंदिया लॉट नं.१८ जय बम्लेश्वरी राईस मिल,फुलचूर,गोंदिया महाराष्ट्र शासन असा मजकूर लिहिलेला होता.तो तांदूळ शासकीय योजनेचा असल्याचे आढळले.या आरोपींवर गुन्हा दाखल टिप्परमधील तांदूळ हा चोरीचा असल्याचे स्पष्ट झाल्याने पोलिस निरीक्षक सचिन म्हेत्रे यांनी टिप्परमधील तांदळाचे प्रत्येकी ५० किलो वजनाचे १८५ कट्टे किंमत १लाख ८५ हजार रुपये तसेच टिप्पर क्रमांक एमएच ३५ एजे १०७१ किंमत १० लाख रुपये असा एकूण १२ लाख ८५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

बम्लेश्वरी गोदाम ढिमरटोली येथून शासकीय तांदूळ चोरी करणाऱ्या आरोपीत मनीष महेंद्र शेंडे(३०,रा.कुऱ्हाडी),सुधीर बेसराज शहारे(३५,रा.मुंडीपार),संजय डोमळे (रा.मिलटोली),धर्मेद्र मारबदे (रा.ढिमरटोली)यांच्यावर गोंदिया ग्रामीण पोलिसात भादंवि कलम ३८०,३८१,३४ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

चारही आरोपींना अटक करण्यात आली आहे.ही कारवाई पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे,अप्पर पोलिस अधीक्षक अशोक बनकर,उपविभागीय पोलिस अधिकारी सुनील ताजने यांच्या मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक सचिन म्हेत्रे यांच्या नेतृत्वात परिवेक्षाधीन पोलिस उपनिरीक्षक रवी कवडे,पोलिस हवालदार कोकोडे यांनी केली आहे.

## पांढरवानी ग्रामस्थांना घर टॅक्स माफ

**सालेकसा :** ग्रामपंचायत पांढरवानी येथील ग्रामस्थांनी घर टॅक्स पासून एका वर्षाकरिता सूट द्यावी अशी मागणी आमगाव देवरी विधानसभा क्षेत्राचे माजी आमदार संजय पुराम यांच्याकडे केली असता. माजी आमदार संजय पुराम यांनी संबंधित अधिकारी,सरपंच संजुकुमार उईके,उपसरपंच दिनेश उईके व ग्रामपंचायत सदस्य यांच्याशी चर्चा करत मार्ग काढून ग्रामस्थांना घर टॅक्स पासून एका वर्षासाठी सुटका देण्याचा निर्णय घेण्यात आला.

# खोडकिडीने रब्बीचे धान पीक होतंय उद्धवस्त!



**सालेकसा:** सततचे ढगाळ वातावरण आणि अवकाळी पाऊस यामुळे रब्बीच्या धान पिकांवर खोडकिडिसह ईतर रोगांचा प्रचंड प्रादुर्भाव वाढल्याने अल्पावधीतच अवघे शेत उद्धवस्त होत असून शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. महसूल आणि कृषी विभागाने तत्काळ शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचून पंचनामे करावे आणि नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी भजेपार ग्राम पंचायतीने सालेकसाचे तहसिलदार आणि तालुका कृषी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे.

बाघ प्रकल्पातील सिंचन आणि खासगी जलस्त्रोत यांच्या माध्यमातून भजेपारसह सालेकसा तालुक्यातील शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर रब्बीच्या धान पिकाची लागवड केली. पिके जोमाने वाढत असतानाच आता मागील काही दिवसांपासून होत असलेला अवकाळी पाऊस आणि ढगाळ वातावरणामुळे किडींचा प्रचंड प्रादुर्भाव वाढलेला आहे. भजेपार येथील अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील धानाचे लोंब सुकून पांढरे पडले असून जवळपास ८० टक्क्यांवर अनेकांचे नुकसान झाले आहे. रोगाचा प्रादुर्भाव एवढा प्रचंड आहे की, एक दोन दिवसातच संपूर्ण शेत उद्धवस्त होत आहेत. आतापर्यंत शेतकऱ्यांनी महागडी औषधे फवारून धानाची जपणूक केली परंतु आता औषधाचा देखील किडींवर परिणाम होताना दिसत नाही. ऐन कापणीवर धान येण्याच्या आधीच हातचे उत्पादन गेल्याने तोंडचा घास गेल्याची प्रचिती आली आहे. पिकांची झालेली प्रचंड हानी आणि यातील गंभीरता प्रशासनाच्या लक्षात यावी म्हणून चक्क रोगाने प्रभावित धानाचे रोपटे तहसिलदार आणि तालुका कृषी अधिकारी यांना निवेदन देतेवेळी दाखवण्यात आले. दरम्यान निवेदनाची प्रतीलीपी क्षेत्राचे आमदार सहसराम कोरोटे यांना पाठविण्यात आली असून या गंभीर बाबीकडे लक्ष द्यावे, प्रशास-नाने शेतक?यांच्या बांधावर प्रत्यक्ष भेटी देऊन नुकसानीचे पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी भजेपारचे सरपंच चंद्रकुमार बहेकार, उपसरपंच कुंदा ब्राह्मणकर, ग्राम पंचायत सदस्य रविशंकर बहेकार, रेवतचंद बहेकार, राजेश बहेकार, मनीषा चुटे, सरस्वता भलावी, आशा शेंडे, ममता शिवणकर,आत्माराम मेंढे यांनी केली आहे. निवेदन देताना ग्राम पंचायत पदाधिकाऱ्यांसह शेतकरी ऋषी ब्राह्मणकर, निलेश चुटे, प्रकाश शेंडे सहित ईतर शेतकरी उपस्थित होते.

# त्रिसूतीचा वापर करुन मलेरिया झिरो करा

**गोंदिया:** दरवर्षी २५ एप्रिल हा जागतिक हिवताप दिन साजरा करण्यात येतो. या दिवसाच्या अनुषंगाने जागतिक आरोग्य संघटनेकडून एक घोषवाक्य देण्यात येते. जनतेमध्ये हिव-ताप, डेंग्यू व इतर कीटकजन्य आजाराविषयी जनजागृती निर्माण होऊन प्रतिबंधात्मक उपाययोजनांची अंमलबजावणी करणे व जनतेच्या सक्रिय सहभाग प्राप्त करुण घेणे हा मागच मुख्य उद्देश आहे. दरम्यान त्रिसुत्रीचा वापर करुन मलेरियाला झिरो करायचे असून कीटकजन्य आजार कमी करण्याच्या दृष्टीकोनातून उत्कृष्ट कामे केलेल्या आरोग्य कर्मचाऱ्यांचा सत्कार हिवताप विभागाकडून होणार असल्याची माहिती जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. वेदप्रकाश चौरागडे यांनी दिली आहे. यावर्षी २५ एप्रिल जागतिक हिवताप दिनाच्या अनुषंगाने हिव वेळ खरी मलेरियाला झिरो करण्याची पुरेशा गुंतवणूक करा, कल्पकतेने अंमलात आणा, हे घोषवाक्य घोषित केले आहे. राज्यात गोंदिया जिल्हा हिवताप संबंधाने संवेदनशील जिल्हा आहे. राज्यातील शेवटच्या टोकावरच जगंलव्याप्त व तलावांचा जिल्हा म्हणून प्रसिद्ध आहे. तसेच जिल्ह्याची सिमा मध्यप्रदेश, छत्तीसडला लागून आहे. शेजारी चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा आहे. सर्व भागात हिततापाचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळतो. शेजारील सर्व भागातून मजूर व लोकांचे स्थलांतर गोंदिया जिल्ह्यात होत असते. त्यासोणत लोक हिवतापाचा प्रादुर्भाव जिल्ह्यात आणत असल्याचे अहवाल आकडेवारी सांगत असते. जिल्ह्यात हिवतापाचा प्रादुर्भाव हा बाराही महिने असते. त्यामुळे कीटकजन्य आजाराचे नियंत्रण करण्याकरिता जिल्ह्यातील जनतेने काळजी घेणे गरजेचे आहे. जूनपासून (पारेषण काळ) पावसाळा सुरु हत असल्याने कीटकजन्य आजाराचा संभाव्य उद्रेक टाळण्यासाठी स्थानिक परिस्थितीनुसार गावपातळीपर्यंत योग्य ते प्रतिबंध व नियंत्रणासाठी उपाययोजना सकर्ततेने राबविणे गरजेचे आहे. कीटकजन्य आजार प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून डास, अळपा, गप्पी मासे, कीटकनाशके आदीबाबत पोस्टर्स बॅनर्सच्या माध्यमातून माहिती नागरिकांना आरोग्य कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून देण्यात येईल. जिल्ह्यात राष्ट्रीय



कीटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत हिवताप आजार प्रतिबंधात्मक उपाययोजनांसाठी जिल्ह्यातील आरोग्य पर्यवेक्षक, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व आशा वर्कर यांच्यामार्फत डास अळी सर्वेक्षण, जलदताप, सर्वेक्षण, ॲबेटिंगल शौचालयाच्या व्हेंट पाईपला जाळी बसविणे, गप्पी मासे सोडणे तसेच प्रतिबंधात्मक उपाययोजनाविषयी आरोग्य शिक्षण देणे, गट सभा घेणे आदी कार्यक्रम नियमितपणे राबविण्यात येतात. तर प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी यांच्यामार्फत रक्त नमुने प्राथमिक आरोग चय केंद्रात तप-ासणी करण्यात येतात.

# नक्षलग्रस्त भरनोलीत वाचनालयाच्या इमारतीचे पोलीस अधिक्षकांच्या हस्ते भूमिपजून



**अर्जुनी मोरगाव:** तालुक्यातील केशोरी पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या नक्षलग्रस्त व अतीदुर्गम भरनोली गावातील वाचनालयाच्या नवीन इमारतीचे भूमिपूजन पोलीस अधिक्षक निखिल पिंगळे यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच या वाचनालयाच्या माध्यमातून परिक्षेत उत्तीर्ण होत विविध शासकिय सेवेत निवड झालेल्या युवक-युवतींचा सत्कार करण्यात आला.

जिल्ह्याच्या शेवटच्या टोकावरील पोलीस स्टेशन केशोरी अंतर्गत नक्षलग्रस्त व अतिदुर्गम भाग म्हणून ओळखले जाणारे गाव म्हणजे भरनोली. पूर्वी भरनोली गावाच्या परिसरात नक्षल्यांचा वावर असल्याने शासनाच्या योजना गावात पोहचत नव्हत्या. सदर गाव जिल्हा मुख्यालया पासून लांब असल्याने स्पर्धा परिक्षेबाबत युवकांना ही कसलीही माहिती नव्हती. या भागातील जास्तीत जास्त युवक-युवती हे शासकिय नोकरी वर लागून त्यांचा शासनात सक्रीय सहभाग वाढावा या संकल्पनेतून सन २०१४ मध्ये सशस्त्र दुर क्षेत्र भरनोलीच्या समोरील खाली जागेत तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन राजमाने, प्रभारी अधिकारी श्री. चिट्टे यांनी जिल्हा पोलीस विभाग व लोकसहभागातून एका ईमारतीचे निर्माण करून दिपस्तंभ वाचनालयाची निर्मिती केली.त्या वाचनालयात अभ्यास करून परिसरातील जवळपास ४० च्या वर युवक-युवतींना शासनाच्या विविध विभागात नोकरी मिळालेली आहे.

सदर वाचनालयास पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी वेळोवेळी भेटी देऊन अभ्यास करणा-या युवक-युवतींना स्पर्धा परिक्षा संदर्भात आपले अनुभव सांगून माहिती देऊन मार्गदर्शन करीत असतात. पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी वाचना लयाला भेट व युवकांना मार्गदर्शन करित असतांना युवकांनी येथे एक प्रशस्त व आधुनिक वाचनालय तसेच पुस्तकें ठेवण्यासाठी कपाट, खुर्च्या, टेबलची गरज असल्याचे पोलीस प्रशासनाकडे सांगितले. त्यानुसार पोलीस ठाणे केशोरीचे ठाणेदार सोमनाथ कदम यांनी वरिष्ठांचे निदर्शनास सदर बाब आणून युवकांना लवकरच या ठिकाणी नवीन ईमारत बनण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले होते.

त्या अनुषंगाने ठाणेदार सोमनाथ कदम यांनी जि. प. सदस्य श्री.श्रीकांत घाटबांधे यांना समस्या अवगत केली होती. त्यांनी आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातून निधीची तरतूद करून वाचनालयासाठी इमारत मंजूर करून घेतली. त्या इमारतीचे भूमिपूजन १८ एप्रिल रोजी पोलीस अधिक्षक निखील पिंगळे, जिल्हा परिषद सदस्य श्रीकांत घाटबांधे यांच्या हस्ते करण्यात आले.तसेच केशोरी, भरनोली व गोठणगांव येथे अभ्यास करून शासनाच्या विविध विभागात निवड झालेल्या १९ युवक-युवतींचा व त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमा प्रसंगी पोलीस स्टेशन केशोरीचे ठाणेदार सोमनाथ कदम, सपोनि जोहेब शेख, पोउपनि अनिल टाफे, पोउपनि ठवकर, पोउपनि बाजड, इतर प्रतिष्ठित मान्यवर मंडळी, स्पर्धा परिक्षेची तयारी करणारे विद्यार्थी व गावकरी उपस्थीत होते.

# हुकूमशाही विरोधात शेतकरी, बाजार समितीत घडवणार परिवर्तन



**आमगाव:-** आमगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणूक संदर्भात रणशिंग बांधून शेतकऱ्यांनी किसान विकास परिवर्तन पैनल तयार करून उमेदवार उभे करून राष्ट्रवादी व भाजप या गट विरुद्ध आव्हान उभे केले आहे. याविषयी किसान विकास परिवर्तन पैनल ने पत्रपरिषद घेऊन तीस वर्षांचा कालावधी व एक हाती सत्त्‍ेचा हुकूमशाहची सत्तेने बाजार समितीचे वाटोळे कसे झाले याचा पाढाच समोर केले.

केंद्र व राज्य सरकारने शेतकरी यांच्या हितासाठी योजनांच्या माध्यमातून शेतकरी यांना विकासाकडे घेऊन जाण्याचा मार्ग निर्माण करून दिले, यात गोंदिया जिल्ह्यातील आमगाव कृषी उत्पन्न बाजार समिती येथील आर्थिक उलाढाल कोट्यवधींची आहे. परंतु या आर्थिक उलाढाल असताना मात्र शेतकऱ्याचे आर्थिक मदत व बाजार समितीचे विकास मात्र बाजार समितीत काही वेक्तींनी पायदळी पडले आहे. स्वार्थ साधून यांच्या शेतकऱ्यांच्या टाळूवरील लोणी खाणारे काही नेत्यांनी बाजार समितीचा विकास केला नाही. शेतकरी संकटात मदत नाही, शेतकऱ्यांना त्यांचे धान्य पुंजने, पशु चारा व गोठे जळीत परिस्थितीत त्यांच्या मदतीला धावून जाण्याचे समर्थ कधी माजी पदाधिकारी व संचालकांनी दाखवले नाही. बाजार समितीत येणाऱ्या शेतकरी आडतीया व मजूर यांच्या हिताचे कार्य शून्य आहे.त्यांना आरोग्य तपासणी, विमा यासह शिवभोजन तर शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यास माजी पदाधिकारी व संचालकांना देता आले नाही.ग्रामीण भागातून येणाऱ्या शेतकरी धान्य विक्री साठी बाजार समितीत अनेकदा रात्रीकाळात अंधारात उघड्यावर रात्र काढतो पण त्याला साधे विश्राम गृहाची सोय उपलब्ध करता आले नाही. आधुनिक शेतीसाठी शेतकऱ्यांना धान्य पीक, भाजीपाला व इतर पीक घेण्यासाठी कधी प्रशिक्षणासाठी मार्गदर्शन करता आले नाही, शेती प्रशिक्षण, बाजारपेठ, आंतरराष्ट्रीय निर्यात, व्यावसायिक मार्गदर्शन इतक्या वर्षात कधी झाले याचे चिंतन करण्याची वेळ आली आहे. बाजार समिती शेतकऱ्यांची पण स्वाथी नेत्यांमुळे मात्र शेतकरीच या ठिकाणी बळी ठरला आहे. योजनांचा लाभ मात्र काही व्यापारी नेत्यांनी उचलून स्वताच्या घश्यात घातले आहे. यामुळे शेतकरी पुत्राना रोजगारापासून वंचित व्हावे लागले.

मागील तीस वर्षांपासून बाजार समितीच्या माजी पदाधिकारी व संचालकांनी हुकूमशाहची सत्ता गाजवली आहे यात मात्र बळी ठरला मात्र शेतकरी!. सामान्य शेतकऱ्यांना डावलून काही व्यापारी नेत्यांनी आपली हुकूमशाहची सत्ता काबीज करण्यासाठी पुन्हा अभद्र युती करून सामान्य शेतकरी यांना यात उमेदवारी दिली नाही. यामुळे सामान्य ग्रामीण शेतकऱ्यांनी बाजार समितीत परिवर्तन घडवून आणण्यासाठी किसान परिवर्तन पैनल तयार करून लढा उभारला आहे. शेतकरी जनतेसाठी यात शंभर टक्के यश हा किसान परिवर्तन पैनलला मिळेल असा विश्वास ग्रामीण शेतकऱ्यांनी दिला आहे. शेतकऱ्यांच्या विकासासाठी आमचे लढा देत आहो नक्की यात यश मिळेल असा विश्वास त्यांनी वेक्त केला. यावेळी पत्र परिषदेत किसान विकास परिवर्तन पैनलचे जेष्ठ कार्यकर्ते सेवकराम ब्राह्मणकर, बंशिधर अग्रवाल, यशवंत मानकर, संजय बहेकार, गुडडा गहरवार, संभूदयाल अग्रीका, मेघश्याम मेंढे, इसुलाल भालेकर आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# काँग्रेस विरोधी भूमिका घेत धोका देणाऱ्यांना पक्षातून निलंबित करा: प्रदेश सचिव पी.जी.कटरे

**गोरेगाव :** कृषी उत्पन्न बाजार समिती गोरेगावची निवडणूक येत्या ३० एप्रिल रोजी होत असून महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष नानाभाऊ पटोले यांनी सहकार क्षेत्र असो की कुठल्याही निवडणुकीत भाजपासोबत आघाडी करण्यात येवू नये. महाविकास आघाडीतील घटक पक्षासोबतच युती करावी असे स्पष्ट निर्देश वजा सुचना दिलेल्या असतानाही गोरेगाव तालुक्यातील काही काँग्रेसच्या नेत्यांनी पक्षाध्यक्षांच्या आदेशाची अवहेलना करीत बाजार समितीच्या निवडणुकीत भाजपसोबत आघाडी केल्याने अशांना पक्षातून निलबिंत करण्यात यावे,अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव पी.जी.कटरे यांनी गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष दिलीप बनसोड यांच्याकडे केली आहे. यावर जिल्हाध्यक्ष बनसोड काय भूमिका घेतात याकडे तालुक्यातीलच नव्हे तर जिल्ह्यातील काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

बाजार समिती निवडणुकीकरीता २० एप्रिल रोजी नामनिर्देशन पत्र परत घेण्याच्या दिवशी मलेशाम येरोला,



संजयकुमार भगतसह काही लोकांनी भाजपशी युती केल्याने पक्षविरोधी कृत्यामुळे पक्षात प्रचंड रोष निर्माण झाला आहे. अशांना त्वरित पक्षातून निलंबित करण्यात यावे असा सुर येऊ लागला आहे. गोरेगाव कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक ३० एप्रिल रोजी होत असून काँग्रेस पक्षाच्या पॅनलकडून लढविणाऱ्या १७ उमेदवारांचे नामनिर्देशन पत्र वैध ठरले. निवडणुकीच्या तयारीसाठी १७ एप्रिल रोजी तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांची सभा घेण्यात आली. चर्चेअंती महाविकास आघाडीतील घटक पक्षाशी युती करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर जिल्हाध्यक्ष दिलीप बनसोड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित सभेला महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कमिटीचे महासचिव डॉ. एन.डी. किरसान, प्रदेश सचिव अमर वराडे, पी.जी. कटरे,जिल्हा व तालुका पदाधिकारी,जिल्हा परिषद सदस्य, तालुका पदाधिकारी, पक्ष कार्यकर्ते आणि निवडणूक लढविणारे उमेदवार उपस्थित होते.या सभेत सर्वांनी एकजुटीने निवडणूक लढविण्याचा निर्धार व्यक्त केला.यावेळी जिल्हाध्यक्ष दिलीप बनसोड यांनी, प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी भाजपासोबत आघाडी करण्यात येवू नये फक्त महाविकास आघाडीतील पक्षासोबत शक्यतोवर युती करावी.भाजपासोबत आघाडी करणाऱ्यावर पक्षविरोधी कृत्य केल्याबद्दल शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात यईल, अशा स्पष्ट सुचना दिल्याचे सांगितले. तसेच जिल्हाध्यक्षांनी गोरेगाव कृषी उत्पन्न बाजार समिती निवडणुकीसाठी प्रभारी म्हणून प्रदेश सचिव अमर वराडे यांची नियुक्ती केली.दरम्यान २० एप्रिल रोजी नामनिर्देशन पत्र परत घेण्याच्या दिवशी मलेशाम येरोला, संजयकुमार भगत, कैलाश डोंगरे, गोपाल ठाकूर, ससेंद्र भगत, पी.सी. चव्हाण यांनी जगदीश येरोला यांच्या निर्देशानुसार भाजपशी युती करीत प्रांताध्यक्षांच्या आदेशाला न जुमानता पक्षाला धोका दिला. तसेच काही उमेदवारांचे उमेदवारी अर्ज मागे घ्यायला लावून पक्षाला अडचणीत आणण्याचे काम केले.तसेच पक्षविरोधी कृत्यामुळे काँग्रेस पक्षाला १८ पैकी ११ जागेवरच उमेदवार रिंगणात उभे करता आले. अशा पक्षविरोधी कारवाया करणाऱ्यांना पक्षातून त्वरित निलंबित करण्यात यावे, अशी मागणी पी.जी. कटरे यांनी जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष दिलीप बनसोड यांच्याकडे केली आहे.तर जगदिश येरोला यांनी आमच्यावर आरोप करणाऱ्यांनीच यापुर्वी भाजप सोबत विविध निवडणुकामंध्ये गठबंधन केल्याचा आरोप केला आहे.त्यामुळे नेमके काय होते याकडे लक्ष लागले आहे.

# सलग १४ तास अभ्यास करुन बाबासाहेबांना अभिवादन

**गोंदिया :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त आदिवासी विकास प्रकल्प देवरी येथी मुला-मुलींच्या शासकीय वसतीगृमध्ये सलग १४ तास अभ्यास करुन साजरा करण्यात आला. वसतिगृहातील मुला-मुलींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आदराजंली अर्पण करुन अभ्यास करण्याचा अगळा वेगळा उपक्रम राबविला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार होते.



प्रकल्प कार्यालयाच्या सभागृहामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जयंतीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. बाबासाहेबांनी देशाला दिलेल्या राज्यघटनेमुळे आपला देश जगातील सशक्त लोकशाही देश म्हणून ओळखला जातो. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे प्रत्येक भारतीयासाठी एक आदर्श व्यक्तिमहत्व आहेत असे मत विकास राचेलवार यांनी व्यक्त केले. ते लहानपणापासून खुप हुशार होते. बाबासाहेब शालेय जीवनात १८ तास अभ्यास करत असत. त्यांनी बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांच्या आर्थिक साहाय्याने परदेशात जाऊन अर्थशास्त्रात एम.ए., पी.एच.डी. या विषयात पदव्या मिळवल्या व बॅरिस्टर झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना आपण माणसाला माणूस मिळवून देणारे अलौकिक व्यक्तिमत्व म्हणून ओळखतो. महाड सत्याग्रह, काळाराम मंदिर प्रवेश, मनुस्मृती दहन, हिंदू कोड बील अशी इतर अनेक सामाजिक कार्ये बाबासाहेबांनी केल्याचे त्यांनी सांगितले.

स्त्री वर्ग, शेतकरी, मजूर, पददलित समाजाला त्यांनी समतेची वाट दाखवून दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील जातीव्यवस्थेविरुद्ध जोरदार लढा दिला. त्यांनी १४ ऑक्टोंबर १९५६ रोजी आपल्या लक्षावधी अनुयायांसह बौद्ध धर्म स्वीकारला. विश्वरत्न डॉ. बाबासाहेबांनी ङ्गशिका, संघटित व्हा व संघर्ष कराफ हा अमूल्य संदेश समाजाला दिला असे ते म्हणाले.

सहायक प्रकल्प अधिकारी एच.आर. सरियाम यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. बाबासाहेबांनी कठीण परिस्थितीमध्ये वंचित घटकांना न्याय देण्याचे काम केले असुन समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी केलेले कार्य अद्वितीय असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन करुन उपस्थितांचे आभार दिपेश मांडे यांनी मानले.

# बाबासाहेब आंबेडकरांना पूजन्यापेक्षा विचार आत्मसात करा-नीरज पटेल

**गोंदिया:** बाबासाहेब आंबेडकरांना पूजन्यापेक्षा त्यांच्या मार्गावर चालून त्यांचे विचार आत्मसात करा असे आवाहन नॅशनल जन्मतचे संपादक नीरज पटेल यांनी (ता.१४) केले.येथील सुभाष शाळेच्या मैदानावर आयोजित डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्व. सामाजिक जयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित जयंती समारंभात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रामाच्या अध्यक्षस्थानी जयंती समितीचे अध्यक्ष नानाजी शेंडे हे होते. मंचावर राष्ट्रमाता सवित्रीमाई फुले महासभेच्या अध्यक्ष दीदी निर्देशसिंग, आदिवासी समाजाचे प्रतिनिधी दुर्गाप्रसाद कोकोडे यांच्यासह



सर्वच समाजाचे कार्यकर्ते मंचावर उपस्थित होते. श्री पटेल पुढे म्हणाले की संपूर्ण देश हा बाबासाहेबांनी लिहिलेल्या राज्य घटनेवर चालतो., तेव्हा आपणही बुद्धीवादी आणि तर्कवादि बना असे आवाहन त्यांनी केलं. यावेळी दीदी निर्देश सिंग यांनीही समायोजित विचार मांडले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पाहुण्यांच्या हस्ते माल्यार्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली.१३ एप्रिलच्या मध्यरात्रीनंतर केक कापून आणि फटाक्याच्या लड्या फोडून बाबासाहेबांच्या जयंतीची सुरुवात झाली. शहरात रॅली काढून बाबासाहेबांच्या जीवनावर आधारित विविध देखाव्यांचे प्रदर्शन घडवीण्यात आले. तरुण तरुणीनी भीमगीतांवार ठेके धरले. दरम्यान जयंती समारंभात समाजातील नावीन्यपूर्ण काम करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये

सहयोग ग्रुपच्या शीतल रामादे, डॉ. शिल्पा मेश्राम, इंजि. उमेश नागदेवे, पोलीस निरीक्षक तेजेंद्र मेश्राम,उपायुक्त संजय थुल आणि रमेश कुकूटकर यांचा समावेश आहे. दुसऱ्या दिवसी ता.१५ ला सामाजिक प्रबोधनपर कॅडर कॅम्पचे आयोजन करून

नागपूरचे इंजि. गोपाल खांबाळकर यांनी मार्गदर्शन केलं. दरम्यान प्राथमिक ते पदविधर विद्यार्थ्यांसाठी बुद्धिमत्ता स्पर्धा परीक्षेचे आयोजन करण्यात येऊन याचा लाभ शंभराहून अधिक विद्यार्थ्यांनी घेतला.या विद्यार्थ्यांना महिला व बालकल्याण अधिकारी संजय गणवीर, शिक्षणाधिकारी डॉ. महेंद्र गजभिये, जिल्हा संख्यिकी अधिकारी रुपेश राऊत यांनी मार्गदर्शन केलं. सवित्रीमाई फुले विचारमंच आणि संथागार महिला विंग च्या महिलांनी मसूर्याची सावली-रमाई माऊलीफ या नाटीकेचे जोरदार सादरीकरण केलं. हे सादरीकरण पाहून दर्शक मंत्रमुग्ध झाले होते.जयंतीच्या सर्वच कार्यकर्त्यांनी युनिफॉर्म ड्रेसकोड परिधान करून जयंतीचे शिस्तबद्ध संचलन केलं त्याचे कौतुक करण्यात आलं. कार्यक्रामाचे संचालन प्रा. दर्शना वासनिक आणि वैशाली खोब्रागडे यांनी तर सहयोग ग्रुपचे सीईओ विलास वासनिक यांनी आभार मानले.

# हरविलेले ५१ मोबाईल केले परत

**गोंदिया:** आजघडीला प्रत्येकाची अत्यावश्यक गोष्ट झालेल्या, मात्र प्रसंगी गहाळ झालेल्या ५१ मोबाईलचा शोध घेऊन पोलिस प्रशासनाने २२ एप्रिल रोजी अक्षय तृतीया व ईदचे औचित्य साधून संबंधितांना मोबाईल परत केले.

मोबाईल हे केवळ आता संवाद साधण्याचे माध्यम राहिले नसून वापत्ता हा मोबाईलमध्ये आपली वैयक्तिक माहिती, महत्वाची कागदपत्रे आदी साठवून ठेवतो. मोबाईल हरविल्यास किंवा चोरी झाल्यास संबंधित मोबाईलचा गैरवापर होण्याची शक्यता असते. हा प्रकार टाळण्यासाठी पोलिस प्रशासन वेगवेगळ्या स्त्रोतांचा वापर करुन मोबाईलचा शोध घेऊन मोबाईल हस्तगत करतात. यातंर्गत २०२१ ते २०२३ दरम्यान मोबाईल चोरीच्या दाखल झालेल्या




प्रकरणाचा शोध घेऊन ५१ मोबाईल जप्त केले. हे मोबाईल अक्षय तृतीया व ईदच्या निमित्त संबंधित मोबाईल धारकांना पोलिस अधीक्षक निखिल पिंगळे व पोलिस अधिकाऱ्यांच्या हस्ते वाटप करण्यात आले. तसेच मोबाईलचा शोध घेणाऱ्या पोलिस अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन करण्यात आले.

सदरची कामगिरी पोलीस स्टेशन गोंदिया शहर पो.नि.चंद्रकांत सुर्यवंशी यांचे मार्गदर्शनात गुन्हे प्रकटीकरण पथकातील स.पो.नि. सागर पाटील, पोहवा. कवलपालसिंग भाटीया, जागेश्वर उईके, सुदेश टेंभरे, सतिश शेंडे, दिपक रहांगडाले, प्रमोद चव्हाण, ओमेश्वर मेश्राम, म.पो.हवा. रिना चव्हाण, पोशि. पुरूषोत्तम देशमुख, सुभाष सोनावने, कुनाल बारेवार, मुकेश रावते, दिनेश बिसेन यांनी केली.सोबतच गहाळ झालेल्या मोबाईलचा सायबर सेल, गोदिया येथील स.पो.नि. शिंदे, पो. हवा दिक्षीत दमाहे, पो. हवा. प्रभाकर पालांदूरकर, पो. हवा. मोहन शेंडे, पो. हवा. संजय मारवाडे, पोशि बरैया यांची तांत्रिक मदत तपासात घेत शोध घेतला. नमुद गहाळ मोबाईल शोधे घेणे बाबत पोशि. पुरूषोत्तम देशमुख यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. वरिष्ठांनी अथक परिश्रम घेवून गहाळ मोबाइलचा शोध करणा?्या अधिकारी अंमलदार यांचे कौतुक आणि अभिनंदन केले आहे.

# उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी उपाययोजना

**गोंदिया :** भारतीय हवामान विभागाद्वारे सद्यस्थितीत विविध ठिकाणी उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात येत आहे. उष्णतेच्या लाटेमुळे शारीरीक ताण पडून मृत्यू देखील होण्याची शक्यता असते. यापासून होणारे गंभीर परिणाम टाळण्यासाठी जिल्ह्यातील नागरिकांनी आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे.

एप्रिल महिन्यापासून राज्यातील अनेक भागात तापमान वाढतांना दिसत आहे. उष्णतेची लाट ही एक मुक आपत्ती आहे. एखाद्या प्रदेशात सलग तीन दिवस नेहमीच्या कमाल तापमानापेक्षा वातावरण ३ डिग्री सेल्शीयसने जास्त असेल किंवा सलग दिवस तापमान ४५ डिग्री सेल्शीयस पेक्षा जास्त असेल तर त्या भागात उष्णतेची लाट आली आहे असे समजावे.

**काय करावे-** तहान लागलेली नसली तरी सुध्दा जास्तीत जास्त पाणी प्यावे. हलकी, पातळ व सच्छिद्र सूती कपडे वापरावेत. घराबाहेर जातांना गॉगल्स, छत्री, टोपी, चप्पलचा वापर करावा. प्रवास करतांना पाण्याची बाटली सोबत घ्यावी. उन्हात काम करीत असलेल्या व्यक्तींनी डोक्यावर टोपी किंवा छत्रीचा वापर करावा तसेच ओल्या कपड्यांनी डोके, मान व चेहरा झाकावा. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी असल्यास ओआरएस, घरी बनविण्यात आलेली लस्सी, लिंबूपाणी, ताक इत्यादिंचा नियमीत वापर करावा. अशक्तपणा, स्थुलपणा, डोकेदुखी, सतत येणारा घाम इत्यादी उन्हाचा झटका बसण्याची चिन्हे ओळखावीत व चक्कर येत असल्यास तात्काळ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा. घर थंड ठेवण्यासाठी पडदे व सनशेडचा वापर करावा. रात्री खिडक्या उघड्या ठेवाव्यात.



पंखे, ओले कपडे यांचा वापर करावा. थंड पाण्याने वेळोवेळी आंघोळ करावी. कामाच्या ठिकाणी जवळच थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी. सुर्यप्रकाशाचा थेट संबंध टाळण्यासाठी कामगारांना सुचित करावे. पहाटेच्या वेळी जास्तीत जास्त कामाचा निपटारा करावा. रस्त्याच्या कडेला उन्हापासून संरक्षणाकरीता शेड उभारावेत. जागोजागी पाणपोईची सुविधा करावी.

**काय करु नये-** लहान मुले किंवा पाळीव प्राण्यांना बंद असलेल्या व पार्क केलेल्या वाहनात ठेऊ नये. दुपारी १२ ते ३.३० या कालावधीत उन्हात बाहेर जाणे टाळावे. गडद, घट्ट व जाड कपडे घालण्याचे टाळावे. बाहेर तापमान अधिक असल्यास शारीरिक श्रमाची कामे टाळावीत.

**उष्माघाताची लक्षणे-** शरीरास घाम सुटणे, वारंवार तहान लागणे, शरीर शुष्क होणे, थकवा येणे, ताप येणे ( १०२ पेक्षा जास्त), त्वचा कोरडी पडणे, भुक न लागणे, चक्कर येणे, निरुत्साही होणे, डोके दुखणे, रक्तदाब वाढणे, मानसिक बेचैनी, अस्वस्थ वाटणे, उलटी होणे, डोळ्याला अंधारी येणे ही उष्माघाताची लक्षणे आहेत.

तरी जिल्ह्यातील नागरिकांनी उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन आपल्या आरोग्याच्या दृष्टीने योग्य ती काळजी घ्यावी. आपल्या आरोग्याच्या बाबतीत गाफील राहू नये, कारण आरोग्य हिच संपत्ती आहे हे विसरुन चालणार नाही.



## ग्रामपंचायत कार्यालय-कटंगी (बु.) ता.गोरेगाव जि.गोंदिया

**विनिदा सुचना प्रपत्र-1**

ग्रामपंचायत कार्यालय कटंगी तालुका गोरेगाव जि.गोंदियाच्यावतीने ग्रामसभा ठराव क्रमांक ०४ व दिनांक-१०/११/२०२१ नुसार सन २०२२-२३ मध्ये ग्रामपंचायतीस अपेक्षित ग्राम रक्कम रू. १९२७६५० रुपयाच्या निधीतून ग्रामपंचायतीने मंजूर केलेल्या विकास आराखड्यानुसार मानव विकास (२५%) उपजिवीका व पोषण महिला व बाल विकास मागासवर्गीयांचा व इतर प्रशासकीय कामे ग्राामपंचायत विकास आराखडा (GPDP) सन २०२२-२३ १५ वा वित्त आयोग निधीतून करावयाचे आहेत. याकरिता इच्छूक कंत्राटदार, पुरवठाधारकांनी ग्रामपंचायत कार्यालय कटंगी येथे प्रत्यक्ष संपर्क साधून आपली निविदा सादर करावी. या संदर्भातील अटी व शर्ती ग्रामपंचायत कार्यालय नोटीस बोर्डावर बघावयास मिळतील.

| अ.क्र. | विकासाचे कामाचे क्षेत्र | विकास कामाचे उपक्रमाचे | विकासाचे कामाचे क्षेत्र/उपक्रमाचे नाव, विकास काम उपक्रमाचा तपशील |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| शिक्षण (10%) | | | जि.प.शाळा फर्निचर खरेदी |
| | | | शाळा, अंगणवाडीला पाणीशुद्धीकरण करिता |
| | | | हॅण्डवॉश स्टेशन तयार करणे |
| आरोग्य (10%) | | | बोरवेल ओटे दुरुस्ती सार्वजनिक विहिर |
| | | | ब्लिचिंग खरेदी |
| उपजिविका व पोषण (5%) | | | सुशिक्षीत बेरोजगारांना प्रशिक्षण |
| महिला व बाल विकास (10%) | | | अंगणवाडी क्रं.१ ते ३ संरक्षण भिंत बांधकाम |
| | | | अंगणवाडी क्रं.२ शौचालय बांधणे मुतारी |
| मागासवर्गीय विकास | | | सोलर लाईट(नाल्या जवळ, गार्डन शाळेजवळ), |
| | | | पाणी टाकी दुरुस्ती |
| इतर व प्रशासकीय | | | ग्रा.पं.संगणक परिचालक मानधन व इतर |
| | | | एल ईडी स्ट्रीट लाईट दुरुस्ती |
| | | | ई रिक्षा दुरुस्ती |
| | | | कचरा कुंडी खरेदी करणे डस्टबिन १ नग |
| | | | सिमेंट बंदिस्त नाली |
| | | | सिमेंट रस्ता दुरुस्ती |
| | | | गोडाउन बांधकाम विस्तारीकरण करणे |
| | | | सार्वजनिक इमारतीचे पाऊस पाणी संकलन |
| | | | सौर उर्जेवर दुहेरी हातपंप |
| | | | वैयक्तिक कुटुंबांना नळाद्वारे पाणीपुरवठा |
| | | | ज्येष्ठ नागरिकांसाठी बैठक व्यवस्था |
| (5%) दिव्यांग कल्याण | | | अपंगासाठी साहित्य खरेदी |

**अरविंद सारवरे**
ग्रामसेवक
ग्रा.पं.कटंगी (बु.)

**श्रीमती तुलसीबाई मेघनाथ टेंभरे**
सरपंच
ग्रा.पं.कटंगी (बु.)

# शाळेत पहिले पाऊल टाकणाऱ्या १५ लाख मुलांच्या पूर्वतयारीसाठी राज्यभरात ६५ हजारहून अधिक शाळांमध्ये मेळावे

**मुंबई** – शिक्षणाचा खरा पाया बालवयातच मजबूत केला गेला पाहिजे. यामुळे पुढच्या शिक्षणाची प्रक्रिया सहज आणि सोपी होते. शाळेत पहिल्यांदाच येणाऱ्या मुलांमध्ये शिकण्याची आवड निर्माण व्हावी,या विचाराने महाराष्ट्रात "पहिले पाऊल- शाळापूर्व तयारी अभियान' हाती घेतले आहे.या अंतर्गत राज्यातील ६५ हजार शासकीय शाळांमध्ये येत्या जूनमध्ये पहिलीच्या वर्गात पहिले पाऊल टाकणाऱ्या सुमारे १५ लाख मुलांची शाळापूर्व तयारी करून घेण्यात येणार असल्याची माहिती शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.२७ तारखेला सिंधुदूर्ग जिल्ह्यातील बांदा जि.प.शाळेतून श्री.केसरकर या अभियानाचा शुभारंभ करणार आहेत.यावेळी शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषदेचे राज्य प्रकल्प संचालक कैलास पगारे आदी उपस्थित होते.

मंत्री श्री.केसरकर म्हणाले,या अभियानात मातांचा सहभाग उल्लेखनीय आहे.सावित्रीबाई फुलेंचा वारसा त्या खऱ्या अर्थाने पुढे नेत आहेत.त्यांच्या सहकार्यानेच हे अभियान यशस्वी होत आहे. जागतिक स्तरावर हे सिद्ध झाले आहे की,वयाच्या आठव्या वर्षापर्यंत मुलांच्या मेंदूचा ८० टक्के विकास होतो.यासाठी बालशिक्षणावर भर देणे आवश्यक आहे.तसेच चांगली पिढी घडवायची असेल तर शिक्षणाबरोबरच मुलांचे संगोपन उत्तम होणेही गरजेचे आहे.या उद्देशाने ३० एप्रिल पर्यंत राज्यभरात हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

अभियानाच्या केंद्रस्थानी लाखो माता गट

मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी झटणाऱ्या त्यांच्या माता या अभियानाच्या केंद्रस्थानी असणार आहेत.सहज उपलब्ध असलेल्या सामग्रीचा उपयोग करून माता गटांच्या मदतीने शालेय प्रवेशासाठी मुलांची तयारी करून घेतली जाणार आहे.मागील वर्षापासून शालेय शिक्षण विभागाने मातांची वाडी/वस्ती निहाय छोटे-छोटे गट तयार करून त्यांना सतत मार्गदर्शन केले आहे.या अभियानाच्या माध्यमातून राज्यभर जवळपास २.६ लाख माता-गटांची स्थापना केली गेली आहे. तेच या अभियानाला पुढे घेऊन जात आहेत.या अभियानात अंगणवाडी सेविकांचे देखील मोलाचे सहकार्य लाभणार आहे.ही संपूर्ण प्रक्रिया सुलभ व्हावी,या अभियानाच्या निमित्ताने बालकांच्या तयारीसाठी विकसित केलेले साहित्य माता गटांना एकाच वेळेत देता यावे,यासाठी राज्यातील सर्व ६५ हजार शासकीय शाळांमध्ये शाळापूर्व तयारीचे पहिला मेळावे २३ ते ३० एप्रिल दरम्यान आयोजित करण्यात आले आहेत.



तसेच दुसरा मेळावा जून महिन्यात घेण्यात येतील.असे शाळापूर्व तयारी मेळावे इतक्या मोठ्या प्रमाणात राज्यभर आयोजित करणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असल्याचे मंत्री श्री.केसरकर यांनी सांगितले.

मागील वर्षी माता गटांच्या,शाळांच्या तसेच समाजाच्या भरघोस प्रतिसादामुळे या अभियानाला चांगले यश मिळालेले आहे.अभियानानंतर केलेल्या सर्वेक्षणात पहिलीत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या बौद्धिक,मानसिक,शारीरिक तसेच भावनिक गुणवत्तेत सरासरी ४० टक्के प्रगती झालेली दिसली.यंदा यंत्रणा अधिक सज्ज असून मागील वर्षापेक्षाही जास्त प्रगती दिसेल,असा विश्वास श्री.केसरकर यांनी व्यक्त केला.

कोरोनामुळे विद्यार्थ्यांच्या शिक्षण प्रक्रियेत व्यत्यय आला होता.त्या आव्हानात्मक परिस्थितीत लहान मुलांच्या शिक्षणात पालकांनी आणि शिक्षकांनी मिळून चांगली भूमिका निभावली आहे. यासाठीच या अभियानात पालकांना सहभागी करून घेतले जात असल्याचे श्री.केसरकर म्हणाले.

**"लोकचळवळ उभी राहणे गरजेच'**

मंत्री श्री.केसरकर म्हणाले, मुलांनी आनंदाने आणि तयारीनिशी शाळेत यावे, यासाठी ही एक चळवळ उभी राहणे आवश्यक आहे.मुलांचा विकास घडविण्यात शाळा आणि शिक्षक हे प्रमुख घटक आहेत. या कार्यात सर्वांना सोबत जोडणे गरजेचे आहे. हेच या अभियानाच्या माध्यमातून केले जात आहे. तथापि केवळ मेळाव्यापुरते किंवा एक-दोन महिन्यांपुरते हे अभियान न राहता आपल्या मुलांचे बालपण आणि त्यांच्या शालेय जीवनाची सुरूवात साजरा करण्याची एक चळवळ निर्माण करण्याचा शासनाचा मानस आहे. या अभियानासाठी निर्मित केलेले साहित्य उत्तम आणि सहज-सुलभ आहे. यातील आयडिया कार्ड वैशिष्ट्यपूर्ण आहेत. त्यात बालकांच्या भावविश्वाचा, त्यांच्या अभिरूची आणि त्यांच्या विकासाला पूरक ठरणाऱ्या कृतींचा विचार केलेला आहे. अगदी ग्रामीण, आदिवासी क्षेत्रातील माता देखील त्या कृती सहजतेने बालकांकडून करून घेऊ शकणार आहेत. त्या कृती करताना आईला देखील आनंद मिळणार असल्याचे ते म्हणाले.

**अभियानासाठी प्रशिक्षण शिबीर**

राज्य स्तरावरून राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र आणि महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत आणि प्रथम या संस्थेच्या सहकार्याने प्रशिक्षण दिल्यानंतर जिल्हा, तालुका आणि ब्लॉक स्तरावर या अभियानासाठी अत्यंत उत्तमरित्या प्रशिक्षण व अंमलबजावणीची तयारी मोहीम पार पडली आहे. आतापयहत ३५ जिल्हे, २८९ ब्लॉक, ७९४ केंद्राच्या स्तरावर प्रशिक्षण सत्र पार पडले आहे. यामध्ये ८१,७६८ अधिकारी आणि शिक्षक सहभागी झाले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

**"मुलांच्या शाळापूर्व तयारीसाठी मातांनी दररोज थोडा वेळ द्यावा'**

पालक आपल्या मुलांच्या भविष्यासाठी नेहमीच तत्पर असतात. सर्व मातांनी दररोज थोडा वेळ आपल्या मुलांच्या शाळापूर्व तयारीसाठी द्यावा, यासोबतच गावातील सरपंच, शाळा व्यवस्थापन समिती, जिल्हा परिषद, गावातील तरूण स्वयंसेवक यांनी देखील याकामी सहकार्य करावे, असे आवाहन श्री.केसरकर यांनी केले आहे. शिक्षक या कामी मदत करतील, असे त्यांनी सांगितले. अभियान या शब्दातच जनसहभाग अपेक्षित आहे. त्यामुळे पुढील शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी आपल्या बालकांची शाळापूर्व तयारी करून घेऊया. बालगोपाळांचा शाळेतील प्रवेश सहज, सुलभ व आनंददायी वातावरणात घडवून आणूया आणि सर्वांनी राष्ट्रनिर्मितीच्या या कामात सहभागी होऊया, असे आवाहनही मंत्री श्री.केसरकर यांनी केले आहे

# ओबीसी जनगणना परिषद व जिल्हा अधिवेशन उत्साहात




**गांदिया:** राष्ट्रीय ओबीसी अधिकारी-कर्मचारी महासंघ शाखा गोंदियाच्यावतीने २४ एप्रिल रोजी भव्य जनगणना परिषद व जिल्हा अधिवेशन तिरोडा येथील नगर परिषदेच्या अटलबिहारी बाजपेई सभागृहात उत्सासात पार पडले. या अधिवेशनाचे उद्घाटन जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नरेश भांडारकर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे होते. कार्यक्रमाला ओबीसी संघर्ष कृती समितीचे जिल्हाध्यक्ष बबलू कटरे, स्टुडंड राईट्स फेरडेशन आफ इंडियाचे अध्यक्ष उमेश कोराम, राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी अधिकारी-कर्मचारी महासंघाचे राज्याध्यक्ष शाम लेडे, ओबीसी अधिकारी मचंचे संयोजक खेमेंद्र कटरे, कर्मचारी अधिकारी महासंघाचे सरचिटणीस अनिल नाचपलल्ले, राज्य समनव्यव विजयकुमार पिनाटे, ओबीसी सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष बी.एम. करमकर, राष्ट्रीय ओबीसी कर्मचारी महासंघाचे राज्य उपाध्यक्ष सुखदेव भालेकर आदि मान्यवर मंचावर उपस्थित होते.

यावेळी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी भारताच्या राज्यघटनेत ओबीसी समाजाचा आर्थिक, शैक्षणिक व सामाजीक मागास-लेपण दूर करण्यासाठी संविधानात कलम ३४० अंतर्भूत आहे. परंतु, स्वतंत्र भारताचे संविधान लागू झाल्यापासून या जनगणनेत ओबीसी समाजाला डावलण्यात आले. बहुसंख्येने असणाऱ्या ओबीसी समाजाच्या सर्वच घटकांना न्याय देण्यासाठी ओबीसींची स्वतंत्र जातीय जनगणना करणे आवश्यक असल्याचे विचार व्यक्त केले. यावेळी उद्घाटन प्रसंगी बोलताना भांडारकर यांनी कर्मचाऱ्यांना पद-ोन्नती व बिंदू नामावली सारख्या हक्काच्या लढाईकरिता संघटीत होणे आवश्यक असल्याचे विचार व्यक्त केले. उपस्थित पाहुण्यांनी ही यावेळी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष संदीप तिडके यांनी केले. संचालन रवि अंबुले व शितल कनपटे यांनी केले. तर आभार डी.एच.चौधरी यांनी मानले.

आयोजनाकरिता कार्याध्यक्ष किशोर डोंगरवार, डी.एच. चौधरी, शितल कानपटे, अशोक बिसेन, विलास डोंगरे, एम.आर. पारधी, पी.आर. पारधी, नरेंद्र आगासे, ए.डी. शरणागत, राधेश्याम ठाकरे, राजू गाढवे, राजू गुन्हेवार, दुयीधन सेंद्रे, विजय पारधी, एन.डी. पटले, कडाव गुरुजी, वाय.एम. भगत, आर.के. पटले, सी.एस. पटले, यू.पी. पारधी, प्रदीप रंगारी, आर.एम. पटले, एच.एस. शेख, रामचंद्र शेलोकार यांनी सहकार्य केले. या अधिवेशनाला जिलह्या-तील सर्वच तालुक्यातील ओबीसी अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**अधिवेशनातील प्रमुख मागण्या**

ओबीसींची स्वतंत्र जातनिहाय जनगणना करण्यात यावी. सर्वच शासकीय विभागात बिंदू नामावली तयार करताना ओबीसींवर झा-लेला अन्याय दूर करून नव्याने कायदेशीर निकषाच्या अधिन राहून रोष्टर तयार करण्यात यावा. राज्यातील सर्व विभागातील ओबीसींचा अनुशेष तत्काळ विशेष कृती कार्यक्रम राबवून भरण्यात यावे. ओबीसी कर्मचारी प्रलंबित पदोन्नती व पदोन्नत्तीमधील आरक्षण तात्काळ लागू करावे. मानव विकास अंतर्गत विद्यार्थ्यांना दुचाकी (सायकल) सुविधा वर्ग ५ पासून विनाअट तत्काळ सुरु करण्यात यावे. बेकायदेशीर क्रिमीलेयरची अट रद्द करण्यात यावी. तालुका स्तरावर ओबीसी विद्यार्थ्यांसाठी होस्टेल व अभ्यासीका वर्ग सुरू करुन जिल्हास्तरावरील मंजूर होस्टेल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शिष्यवृत्ती योजना विन-ाअट लागू करावी. राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिष्वृत्ती वर्ग १० व १२ च्या ओबीसी विद्यार्थ्यांना लागू करण्यात यावी. कर्मचा--यांना जुनी पेंशन लागू करावी व शेतकऱ्यांसाठी पेंशन योजना तयार करावी. ओबीसी उत्थानाचे मंडळ आयोग, नचिअप्पन आयोग, स्वामिनाथन आयोगातील शिफारशी लागू करण्यात यावे.

# बाजार समितीच्या १२६ जागांसाठी २४१ उमेदवार




**गोंदिया:** येत्या २८ व ३० एप्रिल रोजी गोंदिया जिल्ह्यातील सात कृषी उत्पन्न बाजार समितीची सार्वत्रिक निवडणूक होत आहे. निवडणूक कार्यक्रमानुसार २० एप्रिल हा अर्ज मागे घेण्याचा शेवटचा दिवस होता.देवरी वगळता ६ कृषी उत्पन्न बाजार समितीची निवडणूक चुरसीची होणार हे दिसून येत आहे. ७ कृषी उत्पन्न बाजार समितीच्या एकूण १२६ संचालक पदाच्या जागांसाठी रिंगणात २४१ उमेदवार शिल्लक राहिले आहेत. जिल्ह्यात मागील २० दिवसांपासून कृषी उत्पन्न बाजार समितीच्या निवडणुकीचे वारे वाहू लागले आहेत. देवरी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रिंगणात संचालक पदाऐवढेच नामांकन अर्ज शिल्लक राहिल्यामुळे तेथील सर्व उमेदवारांची अविरोध निवड निश्चित झाली आहे. ६ ठिकाणी निवडणूक होण्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. गोंदिया कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रिंगणात एकूण ४४ उमेदवार आहेत तर अर्जुनी मोरगाव-३८, आमगाव-३९, सडक अर्जुनी-३१, गोरेगाव-३१, तिरोडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रिंगणात ४० उमेदवार भाग्य आजमावित आहेत.

**आमगाव व तिरोडा येथील चुरसीची लढत**

तिरोडा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रिंगणात एकूण ८१ उमेदवारांचे नामांकन कायम होते. त्यातील ४१ उमेदवारांनी रिंगणातून माघार घेतली. त्यामुळे ४० उमेदवार रिंगणात भाग्य आजमावित आहेत. त्याच प्रमाणे आमगाव येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या रिंगणात एकूण १०६ उमेदवारांचे नामांकन पात्र ठरले होते. त्यातील ६७ उमेदवारांनी उमेदवारी मागे घेतली. त्यामुळे ३९ उमेदवार रिंगणात भाग्य आजमावत आहेत.

## बाजार समित्यांसाठी मतदान केंद्र झाले ङ्गफायनलफ२८ अन ३० एप्रिल असे दोन टप्प

**गोंदिया बाजार समिती : गोंदिया बाजार समितीत ३८६१ मतदार असून, त्यांच्यासाठी शहरातील मनोहरभाई पटेल म्युनिसिपल हायस्कूल, दवनीवाडा येथील जिल्हा परिषद शाळा व रावणवाडी येथील जिल्हा परिषद शाळेत मतदान केंद्र ठेवण्यात आले आहे.**

**गोरेगाव बाजार समिती : गोरेगाव बाजार समितीत १२७८ मतदार असून, त्यांच्यासाठी शहीद जाम्या-तिम्या हायस्कूलमध्ये मतदान केंद्र ठेवण्यात आले आहे. तिरोडा बाजार समिती : तिरोडा बाजार समिती त १९३० मतदार असून, त्यांच्यासाठी जिल्हा परिषद उत्तर बुनियादी शाळेत मतदान केंद्र ठेवण्यात आले आहे.**

**आमगाव बाजार समिती : आमगाव बाजार समितीत १६३२ मतदार असून, त्यां च्यासाठी आमगाव येथील जिल्हा परिषद शाळा, ग्राम ठाणा येथील जिल्हा परिषद शाळा, ग्राम कालीमाटी येथील जिल्हा परिषद शाळा व ग्राम अंजोरा येथील जिल्हा परिषद शाळेत मतदान केंद्र ठेवण्यात आले आहे.**

**अर्जुनी-मोरगा व बाजार समिती : अर्जुनी-मोरगाव बाजार समितीत १४३२ मतदार असून, त्यांच्यासाठी अर्जुनी-मोरगाव येथील जि ल्हा परिषद हायस्कूल, नवेगावबांध येथील जिल्हा परिषद हायस्कूल, ग्राम महागाव येथील जिल्हा परिषद हायस्कूल व ग्राम केशोरी येथील जिल्हा परिषद हायस्कूलमध्ये मतदान केंद्र ठेवण्यात आले आहे. सडक-अर्जुनी बाजार समिती : सडक-अर्जुनी बाजार समितीत १०७८ मतदार असून, त्यांच्यासाठी सडक-अर्जुनी येथीलच त्रिवेणी हायस्कूल व ज्योती कन्या प्राथमिक शाळेत मतदान केंद्र ठेवण्यात आले आहे. देवरी येथील बाजार समितीची निवडणूक अविरोध झाल्यामुळे आता सहा बाजार समित्यांसाठी निवडणूक घेतली जात आहे. यामध्ये गोंदिया, आमगाव, तिरोडा व अर्जुनी-मोरगाव बाजार समितीसाठी शुक्रवारी (दि .२८) मतदान होणार असून, शनिवारी (दि . २९) मतमोजणी होणार आहे. तर गोरेगा व व सडक-अर्जुनी बाजार समितीसाठी रविवारी (दि.३०) मतदान होणार असून, मतदानानंतर लगेच मतमोजणी होणार आहे.**

# आ.रहांगडाले यांच्या हस्ते चोरखमारा येथे ७० लक्ष निधीचे भूमिपूजन



**तिरोडा:** चोरखमारा येथे नागझिरा वन्यजीव अभयारण्य असून या ठिकाणी विविध प्रांतातून पर्यटक भेट देत असतात पर्यटकांना गैरसोय होऊ नये याकरिता रस्ते विकास होणे गरजेचे आहे याकरिता तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांच्या माध्यमातून चोरखमारा येथे एकूण ७० लक्ष रुपये विकासकामांचे भूमिपूजन संपन्न झाले.

यामध्ये आदिवासी ३०५४ अंतर्गत चोरखमारा कोसमतोंडी रस्ता बांधकाम १० लक्ष, साकोली फाटा चोरखमारा रस्ता बांधकाम १०.००, चोरखमारा पिटेझरी रस्ता बांधकाम १० लक्ष, चोरखमारा कोसमतोंडी रस्ता बांधकाम १० लक्ष, चोरखमारा डॅम रस्ता बांधकाम १० लक्ष, चोरखमारा अप्रोच रस्ता बांधकाम १० लक्ष, चोरखमारा पोच मार्ग रस्ता बांधकाम १० लक्ष या कामांचा समावेश असून भूमिपूजन कार्यक्रमाला प्रामुख्याने तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले, जी.प.सदस्या तुमेश्वरी बघेले, प.स.सदस्य तेजराम चव्हाण,सौ. दिपाली टेंभेकर, सरपंच कांचन रामटेके, वरिष्ठ कार्यकर्ता उमेश पटले, वसंता कुंभरे, पर्यटन मित्र आशिष पारधी व गावकरी उपस्थित होते.

# इसापूर येथे बंद गटर बांधकामाचे भूमिपूजन




**अर्जुनी मोरगावः-** तालुक्यातील इसापूर येथे १५ व्या वित्त आयोग जिल्हा परिषदस्तरीय निधीतून मंजूर बंद गटर बांधकामाचे भूमिपूजन २४ एप्रिल रोजी जिल्हा परिषद सदस्या पौर्णिमा उमाकांत ढेंगे यांच्या हस्ते करण्यात आले. या भूमिपूजन कार्यक्रम अध्यक्षस्थानी ईसापुर ग्रामपंचायतचे सरपंच कल्पना करंबे तर सह उद्घाटक म्हणून माजी सभापती उमाकांत ढेंगे होते.प्रमुख अतिथी म्हणून ग्रामपंचायत सदस्य आनंदराव सोनवणे, दीक्षा लांजेवार,नलिनी चांदेवार, माजी सरपंच लोचन चांदेवार, माजी उपसरपंच गजानन चांदेवार, ग्रामसेवक समीर रामटेके, पत्रकार संतोष रोकडे, माजी उपसरपंच राजेंद्र लांजेवार व इतर मान्यवर उपस्थित होते.

# वार्षिक उद्योग पाहणी अंतर्गत उद्योगांनी उद्योग क्षेत्राच्या वाढीच्या मोजमापात योगदान द्यावे-विजय आहेर




**गोंदिया :** वार्षिक उद्य-ोग पाहणी (अपर्पीरश्र डींीेंशू `ष खपर्वीीीीळशी) हा उद्योगविषयक (संघटित क्षेत्र) महत्वपूर्ण आकडेवारीचा प्रमुख स्त्रोत आहे. या आकडेवारीचा वापर राष्ट्रीय उत्पन्न अंदाज (ऋठ्ठ) तयार करण्यासाठी, औद्योगिक संरचनेचा अभ्यास करण्यासाठी व उद्योगविषयक धोरणे निश्चितीसाठी होतो. राष्ट्रीय स्तरावर सांख्यिकी कार्यालयाकडून देशातील सर्व राज्यांमधील प्रमुख उद्योगांच्या वार्षिक उद्योग पाहणीचे काम करण्यात येते तर राज्यातील उद्योग पाहणीचे काम अर्थ व सांख्यिकी संचालनालय या राज्य शासनाच्या सांख्यिकी विषयक नोडल यंत्रणेकडून करण्यात येत असून निवड करण्यात आलेल्या उद्योगांना सांख्यिकी संग्रहण अधिनियम २००८ खालील तरतुदींनुसार माहिती देणे बंधनकारक आहे.

वार्षिक उद्योग पाहणीच्या क्षेत्रकामातून संकलित करण्यात येणा?्या माहितीची गुणवत्ता वाढविण्यासाठी व क्षेत्रकामाचा दर्जा उंचाविण्याच्या द?ृष्टीकोनातून सन २०२१-२२ या वर्षाच्या क्षेत्रकामासाठी राज्यातील क्षेत्रीय अधिका?्यांची तीन दिवसीय कार्यशाळा १९ ते २१ एप्रिल २०२३ या कालावधीत नियोजन विभागाच्या अधिनस्त अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई तर्फे यशदा, पुणे येथे आयोजित करण्यात आली होती.

कार्यशाळेच्या उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी महासंचालक, यशदा एस. चोकलिंगम, (भा.प्र.से.) व प्रमुख पाहूणे म्हणून सौम्या चक्रवती, उपमहानिदेशक, औद्योगिक सांख्यिकी विभाग, राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय कोलकाता, राष्ट्रीय नमूना पाहणी विभागाच्या पुणे येथील क्षेत्रीय कार्यालयाचे संचालक आलोककुमार, उद्योग विभागाचे प्रतिनिधी पी.डी.रेंदाळकर, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र पुणे आणि विजय आहेर, संचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय हे व्यासपीठावर उपस्थित होते.

राज्यातील प्रादेशिक सांख्यिकी कार्यालयाचे कृष्णा फिरके, सहसंचालक व जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे उपसंचालक रुपेशकुमार राऊत आणि क्षेत्रकाम करणारे कर्मचारी या कार्यशाळेत उपस्थित होते. असे एकूण १६४ अधिकारी व कर्मचारी या कार्यशाळेत सहभागी झाले.

सौम्या चक्रवती, उपमहानिदेशक राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांनी जगात बहुतांश देशांमध्ये वार्षिक उद्योग पाहणी घेण्यात येत असल्याचे सांगून आपल्या देशातील वार्षिक उद्योग पाहणीमध्ये सर्वात अधिक उद्योगांची पाहणी केली जात असल्याची अभिमानास्पद बाब नमूद केली व माहिती विहीत वेळेत संकलित करुन उपलब्ध करुन देण्याचे महत्व अधोरेखित केले.

विजय आहेर, संचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांनी या प्रशिक्षणाचा पुरेपुर लाभ घ्यावा व जरी मनुष्यबळाची कमतरता असली तरी कामाचे योग्य नियोजन करुन शासनासाठी व उद्योग क्षेत्रासाठी महत्वाची असलेली माहिती या पाहणीच्या माध्यमातून वेळेत व गुणवत्तापुर्ण उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या तसेच उद्योगांनी देखील या कामी आवश्यक ते सहकार्य करावे असे आवाहन केले.

श्री. चोकलिंगम यांनी देशा-तील सर्व्हेचा इतिहास, माहितीचे महत्व आणि त्याचा वापर आणि त्यामुळे होणारे अपेक्षित/अनपेक्षित परिणाम याबाबत उदाहरणांसह अतिशय रंजक पद्धतीने उपस्थितांच्या ज्ञानात भर घातली. माहिती तंत्रज्ञानात होत असलेल्या नवनविन प्रगतीद्वारे उपलब्ध होत असलेले आर्टिफिशियल इंटेलिजन्स व मशीन लर्निंग यास-ारखे तंत्रज्ञान याचा विचार करुन माहिती संकलनाच्या पद्धतीमध्ये देखील सुधारणा होण्याच्या दृष्टीने विचार करण्याची आवश्यकता असल्याचे सांगून वार्षिक उद्योग पाहणीच्या कामासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात दिपाली धावरे, उपसंचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांनी वार्षिक उद्योग पाहणीबाबत सर्व उपस्थितांना अवगत केले. नवेन्दु फिरके, सहसंचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय यांनी उद्घाटनाच्या कार्यक्रमासाठी उपस्थित मान्यवरांचे व सर्व उपस्थितांचे आभार मानले.

कार्यशाळेमध्ये रणबीर डे व बाप्पा करमरकर, उपसंचालक राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार कोलकाता, डॉ.प्रदिप आपटे, प्रख्यात अर्थतज्ञ व प्राध्यापक, गोखले अर्थशास्त्र संस्था, पुणे राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यालयाच्या पुणे येथील क्षेत्रीय कार्यालयाचे उपसंचालक श्रीनिवास शिर्के आणि महेश चोरघडे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यशाळेच्या दुस?्या दिवशी डॉ.जितेंद्र चौधरी, अपर संचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय हे सत्र नियंत्रक व तज्ञ मार्गदर्शक म्हणून उपस्थित होते. अर्थ व सांख्यिकी संचालनालयाच्या संबंधित अनुभवी प्रशिक्षकांद्वारे वार्षिक उद्योग पाहणीच्या कामाचे प्रात्यक्षिकासह प्रशिक्षण संगणकावर घेण्यात आले व प्रशिक्षणार्थींच्या अडचणींचे निराकरण करण्यात आले. कार्यशाळेच्या समारोपाच्या कार्यक्रमासाठी डॉ.मल्लीनाथ कलशेट्टी (भा.प्र.से.), उपमहानिदेशक, यशदा पुणे हे अध्यक्ष व पुष्कर भगूरकर, अपर संचालक अर्थ व सांख्यिकी संचालनालय हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आभार प्रदर्शनाने कार्यशाळेची सांगता झाली.

# खारगर प्रकरणात सरकार आकडे लपवतेय,सरकारवर मनुष्यवधाचा गुन्हा नोंदवा-आमदार वंजारी



**गोंदिया-** ज्येष्ठ निरुपणकार श्री आप्पासाहेब धर्माधिकारी यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार देण्यासाठी खारघर येथे १६ एप्रिल रोजी सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. परंतु, आयोजकांनी लोकांच्या जिवांची पर्वा न करता ढिसाळ नियोजन केले. यामुळे अनेकांना जीव गमवावा लागला. त्यामुळे सदर प्रकरणी राज्य सरकारवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, असे प्रतिपादन विधानपरिषदेतील काँग्रेस पक्षाचे प्रतोद व गोंदिया जिल्हा प्रभारी आमदार अभिजित वंजारी यांनी स्थानिय विश्राम भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले.

खारघर येथील सोहळ्याला देशाचे गृहमंत्री अमित शहा यांनी उपस्थित राहून केवळ शक्ती प्रदर्शन केले. परंतु, मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्यांची कुठलीच व्यवस्था केली नाही. परिणामी उन्हामुळे जवळपास पन्नासपेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाल्याचा अंदाज आहे. त्यामुळे सरकारने उत्तर देण्यासाठी दोन दिवसीय विशेष अधिवेशन बोलवावे आणि याप्रकरणी राज्य सरकारवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी आमदार वंजारी यांनी केली.

राज्यकर्ते या दुर्घटनेची जवाबदारी श्रीसेवकांवर ढकलत असून या कार्यक्रमावर शासनाने तब्बल १३ कोटी रुपये खर्च केले. व्यासपीठावर असलेल्या नेत्यांची व्हीआयपी पद्धतीने बडदास्त ठेवण्यात आली. एसी, कुलर असा सारा थाट होता. मात्र, लाखो सेवकांसाठी साधे शामियाने, पेयजलाची सुद्धा व्यवस्था का करण्यात आली नाही? हा आमचा सवाल आहे. कार्यक्रम सुरू असताना अनेक सेवक तडफडून म`ले, अनेकांना भोवळ आली. त्यांना रुग्णवाहिकांद्वारे रुग्णालयात नेत असतांनाही नेत्यांची भाषणबाजी सुरूच होती, हा निर्लज्जपणाचा कळस आहे. हा शासकीय सोहळा राजभवनात आयोजित करण्याऐवजी बेजवाबदरपणे उघड्यावर घेण्यात आला. यावेळी झालेल्या चेंगराचेंगरीमध्ये शेकडो सेवक जायबंदी झाले. मुळात राज्यकर्त्यांनी कार्यक्रम राजकीय करून टाकला. आताही शासन चौदाचजणांचा मृत्यू झाल्याचे सांगून खरे आकडे दडवीत आहे. यामुळे नैतिक जवाबदारी स्वीकारून एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी वंजारी यांनी केली.

यावेळी काँग्रेस जिल्हाध्यक्ष दिलीप बनसोड,प्रदेश सचिव अमर वराडे,पी.जी.कटरे,जिल्हा परिषद सदस्य वंदना काळे, विमल कटरे, छाया नागपूरे, शहर अध्यक्ष जमीर अहमद, गोरेगाव तालुकाध्यक्ष डेमेंद्र रहांगडाले, निलम हलमारे, देवरी तालुकाध्यक्ष संदीप भाटीया आदींची उपस्थिती होती.